सारथी

दीपावली २०१५



सियॅटल महाराष्ट्र मंडळ

Happy Travelling

...at the lowest fares

Clickontours.com

Holiday just a click away!

ClickOnTours is a full-fledged travel agency dedicated to the comfort of travelers. Our offices are located in Canada, US, UK and India.

From most economical airfares, cost-effective and customized hotel bookings, business tours, world cruises, family holiday packages, to car rentals, we offer the finest feast of services for every travel need.

Enjoy lowest airfare for business economy on any airline

Find the best cruise easily with the help of our experts

Lowest hotel room tariff within USA & across the world

Key features:

- Cost-effective & customized airfares, hotel bookings, car rentals
- Lowest rates guaranteed
- Affordable world cruises (USA / Canada / UK / Australia / India)
- Exclusive vacation packages from Alaska to Auckland
- Worldwide service centers

For the best travel deals, call us on **+14252562109** or contact us on **sales@clickontours.com**

Toll-free 877 239 1312

सारथी

संपादिका - सविता धनेश्वर
लिपिक टंकलेखन - स्नेहल पिटके
अंकरचना व सजावट - सविता धनेश्वर
मुखपृष्ठ संकल्पना - तेजल सावडेकर

छपाई व्यवस्थापन - रमा हेरवाडकर
प्रकाशक - सियॅटल महाराष्ट्र मंडळ
मुद्रक - Mail Post, Sammamish, WA

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत आहे असे नाही. कृपया अधिकृत परवानगीशिवाय या अंकातील साहित्य पुनर्मुद्रित करू नये ही नम्र विनंती. जागा व वेळेअभावी काही साहित्याचा या विशेष अंकात समावेश करत आला नाही त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत. या अंकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या काही साहित्यात जरुरीनुसार बदल करण्यात आलेले आहेत. हा अंक आपल्यापुढे ठेवताना त्यात कोठेही त्रुटी राहू नयेत यासाठी आम्ही विशेष काळजी घेतलेली आहे, तरीपण आमच्या नजरचुकीने काही त्रुटी व मुद्रणदोष राहिले असल्यास आपण मोठ्या मनाने आम्हला क्षमा करावी.

धन्यवाद!

आपले नम्र,

संपादक मंडळ

Copyright © Seattle Maharashtra Mandal

अनुक्रमणिका

संपादकीय - सविता धनेश्वर.....४
अध्यक्षीय - रमा हेरवाडकर.....६
Message from the Yuva Mandal ८

कथा

F.R.I.E.N.D.S. - शीतल पटवर्धन-बापट.....१२
गुरुचार - आरती लोटलीकर.....१४
प्रकाश घर - अश्विनी देवधर.....१७
बांफ जास्पर - आमोद सामनेरकर.....१९
प्रतिबिंब - ज्योती पिटके.....२१
बायकांचा विठोबा आणि कार्तिकस्नान - धनश्री केळकर.....२३
Bhalchandra Bhopatkar - Abhay B. Joshi.....२७

काव्य

रासाद्वैत - कादंबिनी धारप.....११
ऋतू वसंत हिरवा - अर्चना साठ्ये.....१३
अस्तित्व - अ. के. राठोड.....२६
तेजास शोधतो मी - कै. श्रीराम पिटके.....२९
मैत्री - अर्चना साठ्ये.....२९
भाऊबीज - अच्युत थत्ते.....३२
कोकिळेची इच्छा - सुमन श्रीराम.....३३
बंध मनाचे - प्रिती महाजन.....३५
पहाट - धनश्री केळकर.....३५
मैत्री - सिद्धी देशपांडे.....३५
एकटा - प्रफुल्ल सुर्वे.....३५
आई म्हणजे फक्त आई असते - अर्चना साठ्ये.....३६
स्वप्नांचे अंबर - भूपेन - नलिनी शाह.....३६
आज कळाले - कादंबिनी धारप.....३७
आपण सारी पुस्तके - धनश्री केळकर.....३८
कृष्णाई - आरती लोटलीकर.....३९
नाती आयुष्यातली - अर्चना साठ्ये.....४०
सदिच्छा संदेश - अ. के. राठोड.....४१
ओळखीचे अनोळखी - प्रफुल्ल सुर्वे.....४१
एक पाऊस हवा आहे - धनश्री केळकर.....४१

पाककला

आम्ही सारे खवय्ये - शिल्पा शशिकांत पटवर्धन.....३०

संपादकीय

प्रिय वाचकहो,

सर्वप्रथम आपणासर्वांना दिवाळीच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेछा! नवीन येणारे २०१६ हे वर्ष आपणासर्वांना सुखसमृधीचे व आरोग्यदायी जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!! २०१५ च्या दिवाळी निमित्ताने हा सारथी अंक आपल्यापुढे ठेवतांना मला अतिशय आनंद होत आहे. या अंकातील वेगवेगळ्या विषयांवरील लेख आणि कविता वाचून आपल्याला नक्कीच आनंद मिळेल याची मला खात्री आहे.

गेल्या काही वर्षात सियॅटलमधे मराठी भाषा आणि मराठी संकृतीचा विस्तार वाढत चाललेला पाहून मला खूप आनंद होत आहे. आज भारतामध्ये मराठी भाषेची आणि संस्कृतीची अवस्था दयनीय होत असली तरी भारताबाहेर तिचा विस्तार जोमाने वाढत आहे. भारताबाहेर राहून मराठी भाषा आणि संस्कृतीचा माझ्या मराठी बंधू आणि भगिनींनी जो आदर वाढवला आहे त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. आणि याला हातभार लावणाऱ्या सियॅटल महाराष्ट्र मंडळाची तर तुमच्याप्रमाणेच मी सुद्धा शतश: आभारी आहे!

गेली अनके वर्ष मंडळाने इथल्या सर्व मराठी आणि इतर भाषीय लोकांना एकत्र आणून त्यांचे एक मोठे कुटुंब तयार केलेले आहे. प्रत्येक महिन्यात रसदार कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना आनंदी वातावरणात ठेवले आहे. त्यांच्यातल्या कला गुणांना भरपूर वाव दिला आहे. लहानमुलांपासून अगदी सियॅटलभेटीला येणाऱ्या आजी-आजोबा, मावशी-मामा, काका-काकू, आणि मित्र-मैत्रिणीनापण प्रोत्साहन दिले आहे. म्हणूनच भेटीवर आलेली ही सर्व मंडळी आपापल्या गावी जातांना सुखद अनुभवांचा आणि सुखद आठवणींचा खजिना आपल्याबरोबर घेवून जातात!

जाता जाता...या सारथी अंकाच्या पूर्णत्वाला ज्यांचे ज्यांचे हातभार लागले त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते. वाचकहो, या अंकात शुद्धलेखनाच्या चुका न होण्यासाठी आम्ही आमच्याकडून सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पण नजरचुकीने काही चुका राहून गेल्या असतील तर मोठ्या मनाने आम्हाला माफ करावे!

धन्यवाद!

आपली,

सविता धनेश्वर

शुभ दीपावली



Illustrations by www.lasercase.cz

Seattle Maharashtra Mandal

Executive committee 2015

Rama Herwadkar
President

Ameet Joshi
Vice - President

Rahul Tarambale
Treasurer

Sheetal Patwardhan
Secretary

Ina Ghangurde
YM Coordinator
And facilities

Jayant Bhopatkar
Webmaster

Vikas Patwardhan
Media

Jagger Bodas
Publicity/Sponsorship



Jyoti Rasal
Decorations

Shweta Kolhatkar
Programming

Reetu Chudasama
Food Committee

Snehal Pitake
Food Committee

Neelima Dighde
membership

Sandesh Moghe
membership

Mohit Chitnis
BMM
Representative

नमस्कार मंडळी,

२०१५ हे वर्ष सियॅटल मंडळासाठी संस्मरणीय ठरले. वर्षभर सादर झालेल्या उत्तमोत्तम कार्यक्रमांमुळे हे नक्कीच एक यशस्वी वर्ष म्हणता येईल. वर्षभर मंडळाने केलेल्या विविध उपक्रमांचा हा छोटासा आढावा.

दरवर्षीप्रमाणे संक्रांतीच्या कार्यक्रमाने नवीन वर्षाची सुरवात झाली. रसभरीत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी तब्बल १९ विक्रेत्यांनी स्टॉल लावले आणि तब्बल ३५० हून अधिक लोकांच्या उपस्थितीत नवीन वर्षाचे जोरदार स्वागत झाले. स्टॉल सोबत विविध खेळांचेही आयोजन करण्यात आले होते. जानेवारी महिन्यात २०० हून अधिक कुटुंबांनी SMM सदस्यत्व घेऊन नवीन वर्षाची जोरदार सुरुवात केली. ह्या मागचे प्रमुख कारण होते, सदस्यत्वामध्ये दिलेली सूट. ह्याचा प्रभाव वर्षभर जाणवला आणि म्हणूनच ३२७ सदस्य संख्येचा आकडा पार करण्यात मंडळाला यश मिळाले. महाराष्ट्र मंडळाचा वाढता परिवार हे मंडळाचे सर्वात मोठे यश आहे असे नक्कीच म्हणता येईल.

फेब्रुवारी महिनियात SMM च्या पुढाकाराने, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०१५ "सा रे ग म" ह्या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत फक्त सियॅटल नव्हे तर व्हॅंनकूव्हर, पोर्टलंड येथीलही स्पर्धकांनी सहभाग घेतला आणि मला हे सांगण्यास खूप आभिमान वाटतो की, जुलै २०१५ ला L.A. मध्ये झालेल्या BMM च्या अधिवेशनात ह्या स्पर्धेची अंतिम फेरी झाली आणि सियॅटलच्या **विभूती कवीश्वर** हिने ही स्पर्धा जिंकून सियॅटलचे नाव झळकावले.

मार्च महिन्यात शेवटच्या आठवड्यात होळी आणि गुढीपाडवा ह्या सणांच्यानिमित्ताने SMM परिवारातील सभासदांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी "talent show" चे आयोजन करण्यात आले होते. सभासदांच्या नृत्य, एकांकिका, गाणे, नकला अशा विविध गुणांना प्रोत्साहन देत पुरण पोळी, कटाची आमटी आणि श्रीखंड ह्या पक्वानांचा लोकांनी आस्वाद घेतला. ह्या कार्यक्रमासही ३०० हून अधिक सभासदांची उपस्थिती लाभली.

मे महिना होता हलक्या फुलक्या सिनेमाचा. तरुणाईला भावेल अशा "कॉफी आणि बरेच काही" ह्या चित्रपटाला सभासदांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला

जून महिन्यात SMM ने आपल्या लहान दोस्तांसाठी शिबीराचे आयोजन केले होते. वय वर्ष ५ ते १५ ह्या वयोगटात आयोजित केलेल्या ह्या शिबीरामध्ये मुलांना महाराष्ट्राची झलक दाखवण्यात आली. ५० मुलांनी ह्यात सहभाग घेतला. महाराष्ट्राचा भव्य इतिहास, तिथल्या कला आणि नृत्य ह्यांची ओळख मुलांना करून देण्यात आली. मुलांनी वारली पेंटिंग केले, मातीच्या गणपतीच्या मूर्ती बनवल्या तसेच मुलांना काही श्लोक शिकवण्यात आले. स्वतःच्या हाताने भेळ कालवून ती खाण्यात मुलांना आलेल्या मजेचे मी कितीही वर्णन केले तरी कमीच पडेल.

जुलै महिना हा SMM साठी महत्वाचा ठरला. महाराष्ट्राचे मानिनीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस ह्यांना भेटण्याचा योग SMM EC ला मिळाला. त्यांचे मराठमोळ्या पद्धतीने स्वागत SMM EC ने केले. ह्या स्वागताने भारावून मुख्यमंत्र्यांनी SMM चा उल्लेख BMM च्या अधिवेशनाच्या प्रमुख भाषणात केला आणि SMM चे कौतुक केले. जुलै महिन्याचा अखेरीस SMM तर्फे उन्हाळी सहलीचे आयोजन केले होते. मनसोक्त आनंदाची लयलूट करणे आणि निवांत गप्पा हा खरा उद्देश. ह्या निमित्ताने फेस पेंटिंग, मेंदी, मुलांसाठी पोत्याची शर्यत, पिनियाटा आणि मोठ्यांसाठी क्रिकेटचे आयोजन केले होते. या बरोबरच गरम गरम सामोसे, भेळ, फळे, आणि चहा पण होता.

ऑगस्ट महिना होता जेष्ठांसाठी. हा कार्यक्रम REDMOND SENIOR CENTER मध्ये आयोजित करण्यात आला होता. जेष्ठांसाठी खास एकांकिका, भजन, कवितांचा कार्यक्रम, हास्य क्लब आणि निरोगी आयुष्यासाठी एक व्याख्यान ह्याचे आयोजन केले होते. जेष्ठांचा ह्या सर्व कार्यक्रमातील सक्रीय सहभाग तरुणांना नक्कीच प्रेरणादायी होता.

मंडळाच्या मोठ्या कार्यक्रमांमधील एक कार्यक्रम म्हणजे लाडक्या गणरायाचे स्वागत. ह्या वर्षीचा गणेशोत्सव ढोल-ताशांच्या तालावर दिमाखात साजरा झाला. राष्ट्रपती A . P . J. अब्दुल कलाम ह्यांच्या स्मरणार्थ मुलांसाठी विज्ञान मेळ्याचे आयोजन केले होते. तसेच संपूर्ण कार्यक्रमाची सजावट अंतराळ विज्ञान ह्या विषयावर आधारित होती. उकडीचे मोदक हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. लहानमुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ह्यात १०० हून अधिक मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला.

ऑक्टोबर महिना हा सुरांच्या सुखद अनुभवाचा ठरला. सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे ह्यांचे गाणी ऐकण्याची संधी SMM परिवाराला मिळाली. हा सुरेल अनुभव कायमस्वरूपी सर्वांच्या स्मरणात राहील.

नोव्हेंबर मध्ये येते दिवाळी. दिवाळी हा SMM तर्फे साजरा होणारा सर्वात मोठा सण. ह्या वर्षाची दिवाळीची मेजवानी होती - दोन एकांकेका. स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या ह्या दोन उत्कृष्ठ कलाकृती होत्या. सभासदांनी दिलेल्या उदंड प्रतिसादामुळे दिवाळीचा कार्यक्रम हा एक यशस्वी कार्यक्रम ठरला.

डिसेंबर महिन्यात SMM तर्फे अतिशय गाजलेल्या "कट्यार काळजात घुसली" ह्या चित्रपटाचे आयोजन केले गेले. ५५० लोकांच्या उपस्थितीत वर्षातील हा शेवटचा कार्यक्रम दणक्यात पार पडला.

कार्यक्रमांव्यतिरिक्त ह्या वर्षी काही महत्वाची पावले SMM तर्फे उचलण्यात आली. ह्या वर्षी “बोर्ड ऑफ ट्रस्टीज” ची स्थापना झाली. काही सक्रीय सभासदांच्या मदतीने नियम ठरवून AGBM मध्ये त्यावर मंजुरी मिळवून त्याची स्थापना करण्यात आली. २०१६ पासून हे कार्यान्वित होईल.

कार्यक्रमाला उपस्थित राहून वर्षभर सभासदांनी SMM EC ला प्रोत्साहन दिले पण त्याच बरोबर सामाजिक बांधिलकी समजून सभासदांनी विदर्भातील शेतकऱ्यांसाठी जी आर्थिक मदत केली त्यासाठी आम्ही आपले सदैव ऋणी राहू. जगभरातून विदर्भातील शेतकऱ्यांसाठी सुरु असलेल्या अनेक प्रयत्नात आपल्याकडून हा खारीचा वाटा.

SMM चा यशस्वी प्रवास साध्य झाला तो अनेक छोट्या उद्योजकांमुळे ज्यांना SMM ने संधी दिली आणि त्यांनी संधीचे सोने केले. त्यांच्या मदतीने कार्यक्रमाचा दर्जा वाढला. मी त्यांची आभारी आहे. यशस्वी वर्ष पार पडताना मला माझ्या टीमची आणि त्यांचा परिवारांची खूप मदत झाली. मी सर्वांची खूप आभारी आहे. मी युवा मंडळाची आणि वर्षभर आम्हाला मदत करणाऱ्या सभासदांची खूप आभारी आहे.

मी सर्वाधिक आभारी आहे आपल्या SMM परिवाराची आणि सर्व सभासदांची. केवळ फक्त आपल्या मदतीने आणि प्रोत्साहनाने SMM हे मोठ्या १० मंडळांच्या पंगतीत जाऊन बसले. हा केवळ फक्त SMM सभासदांचा मान आहे. आपल्या सदिच्छा सदैव SMM सोबत असाव्यात ही विनंती.

जय हिंद जय महाराष्ट्र

रमा हेरवाडकर

Message from the Yuva Mandal…..

In this last calendar year, SMM Yuva Mandal was very active in our community! Our first large event of the year was Relay for Life in the spring. Each year Yuva Mandal participates in Issaquah Relay for Life as "Team It's Chai Time". Relay for Life is a 20 hour relay walk to raise money and awareness for cancer research as well as cancer patients and survivors. This year, Yuva Mandal raised $6,086.82 in total through SMM events as well as door-to-door and online fundraising. Additionally, we sold Iced Chai, Cookies, and Mehndi at the event which contributed to our total. May 9, the day of the event, we went to Issaquah High School and had at least one person walking on the track for the whole 20 hours. Our efforts (including the money we raised) went towards cancer patients, their families, and funding cancer research. This marked the end of the 2014-2015 Yuva year. We held elections and meetings in the summer to elect our new officers and plan for the upcoming year.

In the fall, we helped at the Ganapati and Diwali SMM Events doing various jobs. At the Ganapati event, we distributed prasad following the pooja, helped serve lunch, and sold snacks throughout the program. At the Diwali event, we babysat children during the event and played games, colored, and did various activities with them. Our second large project of the year was for Adopt-A-Family wherein we were given the information and wish-lists of approximately 9 underprivileged kids in order to buy them basic necessities and gifts. This year, we used money from the SMM, from selling snacks at the Ganapati program, and from selling home-baked cookies door-to-door, and bought gifts such as Pokémon cards, Legos, headphones, and more gifts for 9 kids coming from 3 families. In addition, we bought each family a gift card to grocery stores.

In the coming Spring, we look forward to the 2016 Relay for Life and hope to utilize the next months to fundraise and continue being a helpful presence at SMM events! If you would like more information regarding Yuva Mandal, you can go to our website at http://smmyuva.weebly.com/mandal-members.html.

Nikhil Deo
Vice President

Vikram Ghangurde
President

Nikhil Deo
Vice - President



Esha Harwalkar
Secretary

Divya Rane
Treasurer

Siddharth Kulkarni
Webmaster

Ruta Dhaneshwar

Milinda Bhopatkar

Nikhil Ghangurde

Ankita Dighde



Tanvi Mane

Sharvani Kulkarni

Vallerie Bhopatkar

Illustrations by www.lasercase.cz



Serena Bhadsavle

Illustrations by www.lasercase.cz

डिसेंबर २९, २०१५

रमा हेरवाडकर
अध्यक्षा, सिॲटल् महाराष्ट्र मंडळ

सिॲटलच्या मराठी बांधवांच्या दातृत्वाचं आणि त्याला साद घालणाऱ्या नेतृत्वाचं कौतुक करायला माझ्यापाशी खरंच शब्द नाहीत. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन महाराष्ट्रातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी तुम्ही सर्वांनी संकलित केलेला $३३,२८१.१४ निधी ही उत्तर अमेरिकेतल्या सगळ्याच मराठी बांधवांसाठी एक प्रेरणादायी घटना आहे. महाराष्ट्रातल्या मातीशी आपण सर्वजण नातं सांगतो पण त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी आज सिॲटल् मधला मराठी समाज एकत्रित आला आणि आपण सर्वांनी हा भरघोस निधी जमवलात त्या बद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक आभार.

तुमच्या सूचनेप्रमाणे हा निधी "NAAM" आणि "Adopt a Widow" ह्या दोन्ही प्रकल्पांसाठी सम प्रमाणात विभागून दिला जाईल. निधी संकलनाच्या ह्या उपक्रमात महाराष्ट्र फाऊंडेशन आमचे सहकारी आहेत. निधीचे हस्तांतरण त्यांच्या द्वारे प्रत्यक्षपणे करण्यात येईल. निधीची सर्व रक्कम ह्या प्रकल्पांनाच दिली जाईल ह्याची आम्ही हमी देतो आणि निधीच्या विनियोगासंबंधीची अधिक माहिती सुद्धा महाराष्ट्र फाऊंडेशन मार्फत आपल्या पर्यंत पोहोचवण्याची आमची जबाबदारी राहील.

स्वकर्तृत्वाच्या बळावर यशस्वी झालेला उत्तर अमेरिकेतला मराठी समाज आज दातृत्वात सुद्धा अग्रणी राहू शकतो हे सिॲटलच्या लोकांनी सिद्ध केलं आहे आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०१७ साली डेट्रॉइट येथे संपन्न होणाऱ्या अधिवेशनात सिॲटल् महाराष्ट्र मंडळाचा आमच्यावतीने एक विशेष पुरस्कार देऊन गौरव केला जाईल हे मी आपल्या सर्व सभासदांसाठी घोषित करतो.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सामाजिक प्रकल्पांमध्ये यापुढे आपल्या सर्वांचं असंच उत्स्फूर्त आणि उल्लेखनीय सहकार्य लाभेल अशी आशा करून पुनश्च एकवार आपल्या सर्व देणगीदारांचे आणि मंडळाच्या कार्यकारिणीचे मी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीच्यावतीने आभार मानतो.

आपला कृपाभिलाषी,

नितीन जोशी
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ – उत्तर अमेरिका

नमस्कार मित्रहो,

आपणा सर्वांना माहीतच असेल की महाराष्ट्रातील विदर्भ प्रांत आणि आजूबाजूचा परिसर गेली बरीच वर्ष दुष्काळग्रस्त आहे. त्यामुळे तिथले शेतकरी व त्यांच्या परिवारास उदरभरणासाठी कर्ज काढावी लागत आहेत. त्या कर्जाच्या डोंगराखाली हे शेतकरी चिरडले गेले असल्यामुळे काहींनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे. ह्यामुळे त्यांच्या मागे त्यांच्या परिवाराचे अत्यंत हाल होत आहेत आणि त्यांना जगणं अशक्य झालं आहे. जिकडे खायचीच भ्रांत आहे तिकडे शिक्षण किंवा इतर गुणांचा विकास कसा होणार?

२०१५ गणेशोत्सव कार्यक्रमात आम्ही समस्त सियॅटलवासियांना आवर्जून आवाहन केलं होतं की त्यांनी सढळ हाताने आपल्या ह्या बांधवांची आणि त्यांच्या परिवाराची मदत करवि. त्या आमच्या आवाहनाला तुम्हा सर्वांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे. आज आम्हाला हे सांगायला अतिशय अभिमान वाटत आहे की सियॅटल महाराष्ट्र मंडळाच्या ह्या मोहिमेतून ३३,००० डॉलर चा निधी भारतातील ना. म. आणि adopt-a-widow ह्या दोन प्रकल्पांना देण्यात आला आहे. उत्तर अमेरिकेतून ह्या दोन प्रकल्पांसाठी जमा केलेल्या एकूण निधीची ६६% रक्कम ही सियाटल मधून जमा होणे ही केवळ अभिमानाचीच नव्हे तर प्रेरणादायक गोष्ट आहे.

ह्या उल्लेखनीय सहकाऱ्याबद्दल सियॅटल महाराष्ट्र मंडळ तुम्हा सर्वांचे शतशः आभारी आहे.

- जयंत भोपटकर

सदस्य, सियॅटल महाराष्ट्र मंडळ



Illustrations by www.lasercase.cz

रासाद्वैत

कोजागिरीचा चंद्र उतरला
यमुनेच्या नेत्रात
वृंदावनी या रास रंगला
चंदेरी रातीत

उन्मनी राधा उन्मनी गोपी
उन्मनी झाली अवघी सृष्टी
कान्हाच्या मुरलीतून उठता
सप्तस्वरांच्या आनदं लहरी

टिपर्यांच्या तालावरती
मुरलीच्या तानांवरती
गोरस नाचे संगे त्यांच्या
थरथरत्या पात्रांमधुनी

भान हरपले अस्तित्वाचे
नुरली राधा, नुरल्या गोपी
लोक लाज सोडून वाहिले
जीवन अवघे कान्होबासी

वक्षवल्ली अन वनचर सारे
नदी नाले अन वसुंधराही
चांदण भरले गगनही नाचे
मनमुक्ताच्या चरणांपाशी

मंद फडफडे मस्तकावरी
मोरपीस ते नाजुकसे
कंठाभवती मोहक माला
वैजयंती अन रुळत असे

राधा कान्हा, गोपी कान्हा
टिपरी कान्हा, मुरली कान्हा
रास खेळतो जगदीश्वर हा
पाजत अमृत अद्वैताचे

- कादंबिनी धारप

F.R.I.E.N.D.S.

प्रेमाचे सुंदर, उत्कट आणि तरल रूप म्हणजेच जगातील एक सुंदर असे नाते 'मैत्री'.

खर तर 'मैत्री' हे एक अजब रसायनच आहे कारण त्याचे पृथःकरण करणे अत्यंत कठीण गोष्ट आहे. 'मैत्री' या दोनच अक्षरी शब्दात खूप मोठे सामर्थ्य दडले आहे. असे सामर्थ्य लक्षात घेऊन कोणाची मैत्री पटकन होते तर कधी अनेक वर्ष एकमेकांना ओळखूनही मैत्री मात्र अनोळखीच राहते. मैत्रीचे अनोखे संबंध म्हणजे आयुष्याला एका वेगळ्या नात्यात बांधून, ओवून टाकण्याची गोष्ट आहे.

देश, भाषा, जातपात, लिंगभेद न जुमानता त्याच्या पलीकडचे असे एक दुर्मिळ अनमोल रत्न म्हणजे 'मैत्री'. अशा या बंधनमुक्त नात्याला पशु पक्षीही अपवाद नाहीत हेच खरे. जितका पाय दणकट व खोल तितकी इमारत भव्य आणि उत्तुंग. अशाच मैत्रीच्या इमारतीचा पाया म्हणजे 'विश्वास'. प्रत्येक झाडाची मुळे जेव्हढी खोलवर तितकेच झाड अधिकाधिक बहरते. असेच काहीसे मैत्रीचे आहे. ती एखाद्या फुलपाखराप्रमाणे जितकी उमलेल तितकी आनंदाच्या शिखरावर उंच भरारी घेईल.

आपला स्वभाव, मते, मने एकमेकांशी जुळत गेले तर समोरच्या व्यक्तीशी आपली मैत्री पटकन होते अर्थात विश्वास, प्रेम, आपुलकी जपले तर! एकमेकांकडून कोणतीही अपेक्षा न करता स्वतःला विसरून संबंध निर्माण करणे म्हणजेच 'मैत्री'. स्वतःच्या इतर नात्यात जी बंधने असतात, अपेक्षांच्या शृंखला असतात त्या मैत्रीत कधीही नसतात. मैत्रीत सततच स्वतःला अभिव्यक्त करता येते मन मोकळे करता येते.

आनंदाच्या क्षणी सर्वच नेहमी बरोबर असतात परंतु एखाद्या कठीण प्रसंगात जो आपली साथ देतो तो खरा मित्र. ते म्हणतात ना "सुख के सब साथी, दुख में न कोय". उत्तम मैत्रीची लक्षणे म्हणजे एखाद्या कठीण प्रसंगात साथ देणे, धीर देणे, आपला आत्मविश्वास बळकट करणे असे मला वाटते. अंतर्बाह्य, स्वच्छ, निकोप व निखळ आनंद देणारी मैत्री म्हणजे निर्मळ पाणीच जणू!

मैत्री म्हणजे जणू एक पारा आहे. स्नेहबंधानाची ऊब लागल्याशिवाय तो वर चढतच नाही. कवी रहीमजी म्हणतात ते अगदी तंतोतंत खरे आहे की ''मैत्री नसावी काकडीसारखी. जी वरून एकसंध दिसते परंतु आतून तिच्यात तीन भाग असतात.'' एकदा का मैत्रीचा नाजूक धागा तुटला कि तो परत जोडणे अशक्य होते. प्रत्येकाच्याच आयुष्यात मैत्रीचे धागे जोडले गेले तर समाधानी आयुष्य जगता येईल .

सध्याच्या २१ व्या शतकात अगदी इंटरनेट वरून इतर देशातील मित्र मैत्रिणींशी मैत्रीचे बंध टिकवणे खूप सुकर झाले आहे. WhatsApp, ई-मेल वर भरपूर मैत्रीचे धागे विणले जातात. बरेच वर्षानी भेटलेले मित्र पुन्हा नवी मैत्री अनुभवतात. नवीन घर घेताना हवा असलेला सल्ला असो वा घरगुती अडचणी असो, आजारपण असो वा वाढदिवसाच्या शुभेच्छा असो चार दिशांना असलेले सर्व मित्र आपल्या मैत्रीच्या नात्यातून एकमेकांना साथ देतात. जसे मी म्हंटले एकदा का मने जुळली कि मैत्री झाली, मग कुठलेही क्षेत्र असो राजकारण, सांस्कुतिक वा धार्मिक. फक्त अशी मैत्री तात्पुरती नसावी.

जसे पेराल तसे उगवते. माणसे जोडली कि वेळ प्रसंगी हाकेला जो धावून येतो तो खरा मित्र. एखाद्या सामाजिक बांधिलकीतून मैत्रीचा हात देणे, मदत करणे

प्रेमाने वागणे ह्या गोष्टी सर्वश्रेष्ठ आहेत हेच खरे. आता मैत्री मैत्रीत अनेक प्रकार आहेत. जसे दोन देशांमधील मैत्री, शाळेतील मैत्री, College मधील मैत्री, office मधील मैत्री. अशी मैत्री शुद्ध आणि स्वच्छपणे टिकवणे हे आपल्याच हातात असते. काही माणसे थोड्या वेळासाठी एकत्र येतात जसे पिकनिकसाठी, परदेशात जाताना विमानात, फिरायला. त्याला वयाची मर्यादा नसते वा एकमेकांसाठी खर्च केलेल्या वेळेची मूल्यमापन नसते. ज्या मैत्रीत गुणवत्ता असते ती टिकते अथवा अर्ध्या वळणावर एकटीच राहते.

म्हणूनच मला म्हणावेसे वाटते,
धागा धागा मित्रत्वाचा, पवित्रतेचा ।
उभा आडवा गुंफुनी विणूया प्रेमाचा ।
देवानंतर मित्रही स्मरुया ।
रेशीमगाठी आपणच जपूया !
सुंदर नाते असावे
एका भक्कम विश्वासाचे
अतूट बंध आयुष्यभराचे
तुझ्या माझ्या मैत्रीचे !

- शीतल पटवर्धन-बापट
(Bellevue)

Illustrations by www.lasercase.cz

ऋतू वसंत हिरवा....

ऋतू वसतं हिरवा आला घेउनी हवेत गारवा
दिसे आकाशी पाखरांचा तो स्वच्छंदी थवा
वाऱ्यासगं डोलणारे ते रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ
नदीचे ते झुळझुळणारे पाणी निळे निळे स्वच्छ
फुलपाखरे सुद्धा ती फुलांच्या प्रेमात मुक्त रंगलेली
गारगोट्या नि खडकं नदीमध्ये चिंब चिंब भिजलेली
चिमुकल्या पक्षांचे ते मंजुळ किलबिल गाणे
अन फुलाचे भुंग्याकडे ते हळूच लाजून पाहणे
चमचमणारी नाजुकशी ती सुर्य किरणं सोनेरी
लाजून त्यांच्या स्पर्शाने होणारी ती वाळू रुपेरी
तारकांचे चंद्राभोवतीचे ते उगीचच घुटमळणे
पहिल्याच भेटीमध्ये त्या दोन मनांचे जुळणे
ऋतू वसतं हिरवा असा सुंदर हवाहवासा वाटणारा
रुक्ष मनात पुन्हा एकदा नवीन पालवी फुलवविणारा

- अर्चना साठ्ये

Illustrations by www.lasercase.cz

गुरुचार

जगामध्ये सगळ्या घटनांमधून आणि आपल्या डोळ्याने जे दिसते त्या प्रत्येक क्षणातून काहीना काही शिकण्यासारखे असतेच. पण कळत नकळत जे डोळ्याने दिसत नाही आणि मनाने कळते पण वळत नाही त्याच गोष्टीतून खरे खूप काही शिकण्यासारखे असते असे नाही वाटतं तुम्हाला?

माहित नाही पण असाच एक दिवस विचार करता करता आपल्या आयुष्यातले गुरु कोण समजावे आणि गुरु किती ह्या विषयाकडे वळाले आणि एवढ्या गोष्टी सापडल्या कि मलाच माझे मनोरंजक वाटले! गुरु म्हंटले की आपल्या समोर गुरूंची मूर्ती उभी रहाते किंवा गुरु ग्रह आपल्याला माहिती आहेच. आणि आपल्या शिक्षकांना गुरु म्हणू शकतो. पण आयुष्याचे जे चार गुरु आपल्याला खरे आयुष्य शिकवून जातात.....

त्यातला पहिला गुरु जो आहे तो आपल्या आयुष्यचे भले करणारा आहे, ते म्हणजे आपले आई-वडील. ते कसेही असले तरी काही नियोजनबद्ध पद्धतीने ते आपल्या पदरात व आपण त्यांच्या पदरात पडलो....कसेहि असले, चांगले-वाईट, श्रीमंत-गरीब, पैसेवाले किवा वेळेला पैसे न देणारे, बाप व्यसनी व आई प्रेमळ किवा खूपच व्यवस्थित...खूप प्रेमळ किंवा आपल्या नजरेतून अतिशय दुष्ट, असे वेगवेगळ्या प्रकारे आपण त्यांची गणना करतोच...कसेहि असोत पण शेवटी ते आपले आई-वडीलच असतात... त्यांच्याकडून आपण कसे शिकतो व काय घेतो, जे घ्यायला पाहिजे तेच घेतो का, का नको ते घेतो, हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते असे मला वाटते. आई वडील आपल्याला कसे हवे आहेत ही निवड देवाने आपल्याला अजीबत दिलेली नाही. आपल्या मागच्या जन्माच्या कर्मानुसार व त्यांच्या मागच्या जन्माच्या कर्मानुसार आपल्याला ते आणि आपण त्यांना मिळालेलो असतो. पण आपण त्यांचा मुलगा अथवा मुलगी म्हणून कसे असायला पाहिजे हे सर्वस्वी आपल्यावरच आहे व आपली सद्सद्विवेकबुद्धी आहे असे मी म्हणेन. त्यांच्याकडून जेवढ्या म्हणून चांगल्या गोष्टी शिकता येतील तेवढ्या शिकून घेणे हे आपले कर्म आपल्यालाच उपयोगी पडणार आहे. भावनिकरित्या, शारीरिकरित्या ते कळतं नकळतं आपला विकासच करत असतात. त्यांचे आपण मनापासून करणे हे खर्या अर्थाने गुरुचरणी सेवाच आहे. त्यांची सेवा करायला मिळणे ही नशिबाची मोठी देणं आहे असे मी समजते.

दुसरा गुरु जो आपल्याला कळतं नकळतं शिकवतच असतो तो म्हणजे आपल्या अवतीभवती असलेले लोकं. मित्र, कामावरचे सहकारी, नातेवाईक, समाज आणि लहानपणापासून एकटा का घराच्या बाहेर पडल्यावर जे जे अनुभव आपल्याला येत जातात ते अनुभव. त्या अनुभवातून आपण काय चांगले घेतो आणि वाईट सोडून देतो हे खूप महत्त्वाचे आहे आणि पुढे जाण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यातूनच आपले एक सुंदर व्यक्तिमत्व बनत जाते. आपल्या आजूबाजूला खूप वेगवेगळ्या प्रकारचे लोकं असतात, काही चांगल्या पद्धतीने वागवतात तर काही खूप वाईट पद्धतीने वागवतात, प्रत्येकजण आपापल्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे आपल्याशी वागत असतो. पण कसेही असले तरी ते एक प्रकारे आपल्याला घडवतच असतात. म्हणून मला असे वाटते कि ते सुद्धा आपल्या आयुष्यात महत्वाचे गुरु असतात .

आपल्या आयुष्याचा तिसरा गुरु तुम्हाला कोण वाटते, कोण असेल?

तिसरा गुरु, दुसरं तिसरं कोणी नसून, आपली मुले, आपल्या अवतीभवती असलेली मुले आहेत. लहान मुलांकडून बर्याच गोष्टी शिकण्यासारख्या असतात. सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्यांचे मन!! खूप निरागस आणि निखळ असते. म्हणून त्यांच्याकडे पहिले तर छान वाटते, एकदम तरतरीत! ते भांडले तर परत त्यांना एकत्र यायला वेळ लागत नाही. त्यांच्या भावना ते मनापासून दाखवत असतात. त्यांना कोणी आपलेपणाने सांगितले तर ते ऐकतातपण. त्यांना एकमेकांमध्ये मिसळायला वेळ लागत नाही. आपण जसे जसे मोठे होतो तसेतसे आपल्याला हेवेदावे, अहंकार, मदमत्सर ह्याची वाळवी लगायला लागते. आणि ती आपल्याला कशाप्रकारे पोखरत असते ते आपल्याला कळतं नसते. चांगले लोकं दूर जाताना दिसतात. त्यांची किंमत आपण करू शकत नाही. मला असे खरेच मंनापासून वाटते की, लहान मुलांकडून त्यांचे हे सुंदर आणि अप्रतिम गुण खरेच आत्मसात करायला पाहिजेत. माणूस कितीही मोठा झाला तरीही मनाने आणि हृदयाने त्याने लहान मुलातले मुलचं असायला पाहिजे, म्हणजे जीवनाचा खरा आनंद घेता येतो.

आपल्या आयुष्याचा सर्वात महत्वाचा आणि आपल्या आयुष्यातून आपण वगळू शकत नाही असा कोणी गुरु असेल तर आपले वार्धक्य असे समजायला हरकत नाही. जसे जसे आपल्याला वेगवेगळे अनुभव यायला लागतात, तसेतसे माणसाचे विचार पण कमी होतं जातात, माणूस जास्तीतजास्त हळवा होत जातो मग सत्य बाहेर येते. त्याचा सर्व हिशोब म्हातारपणात चुकता करावाच लागतो. तुम्ही तुमचे आयुष्य कसे काढले त्याचे खरे उत्तर तुमच्या म्हातारपणात मिळते. ती एक वेळ अशी येते की, बेरजा, वजाबाक्या, गुणाकार, भागाकार आणि बरोबर किती हे कळते. हे सर्व कळताना बाकी शुन्य हे ज्ञान कळून चुकते.

अशा येनंतेनं प्रकारे हे आपल्या आयुष्याचे गुरुचार आपल्याला सर्वार्थाने आयुष्य कसे जगायला पाहिजे हे शिकवतात.

- आरती लोटलीकर

चित्रकार-भूपेन शाह

INDIAN CUISINE

BELLEVUE 425-641-4442
BOTHELL 425-481-6900

FOODS

REDMOND 425-861-3800
BOTHELL 425-483-3000
ISSAQUAH 425-313-1983

VIDEO

REDMOND 425-881-6925

BAKERY

REDMOND 425-881-6284

CHAT & SWEETS

REDMOND 425-881-6284

mayuri

FAMILY OF BUSINESSES

THANK YOU FOR YOUR CONTINUOUS PATRONAGE TO OUR FAMILY OF BUSINESSES

MAYURI FAMILY OF BUSINESSES

www.mayuriseattle.com

1.800.874.5593

प्रकाश घर

अनादी काळापासून मनुष्याला प्रकाशाचं आकर्णष आहे. रात्रीच्या अज्ञात गुढातून आणि अस्वस्थ भीतीतून जन्म घेणारी जाणीव लोप पावते जेव्हा तिला प्रकाशाचा स्पर्श होतो. मग ती रात्रीनतंर येणारी पहाट असो, काळोखाला चिरीत जाणारी एखादी ज्योत असो, किवा आपल्या प्रखर तजोने सा-या चराचरालाच प्राण शक्ती देणारा सुर्य असो, माणसाने कायमच प्रकाशाची वाट धरली आहे. कुठल्याही अधं:कारला छेद देण्यासाठी, स्वत:च्याच सामर्थ्याचा वेध घेण्यासाठी, नव्या मार्गांचे नकाशे आखण्यासाठी आणि नव्या स्वप्नांना जन्म देण्यासाठी माणूस कायम प्रकाशाच्या दिशेनेच मार्गक्रमण करीत आला आहे. कारण प्रकाश हे आहे आशचे चिन्ह. स्वप्ने आणि आशा ह्याशिवाय माणूस जगूच शकत नाही. आजच्या प्रतिकूलतेवर मात करायची शक्ती त्याला उद्याच्या आशनेचे दिलेली असते. जीवनात अपरिहार्य असणा-या वा-या-वादळांना तोंड देण्याची बेदरकारीसुद्धा त्यातूनच येते. अशाच प्रकाशाचे आणि आशेचे आश्वासन देत उभे असते ते दीपगृह...प्रकाश घर

कॅनडाच्या प्रिन्स एडवर्ड आयलडंवर उभे असलेले, किंवा इंग्लडं मधील न्यू हेवन इथे असलेले किंवा सिॲटल मधील वेस्ट पोइण्ट इथे असलेले दीपगृह ही सारी बघताना एक अनामिक किंवा गूढ आकर्षण मनात मूळ धरू लागले होते. मुळात मला पुढे काय होणार आहे ह्यापेक्षा मागे काय काय झालेले आहे त्याबद्दल फार ओढ आहे. त्यामुळे कुठलीही ऐतिहासिक ठिकाणे बघतांना मी खूप भारावूनच गेलेली असते. वर्षानुवर्षे घडत आलेल्या घटनांचे, ख-याखोट्या इतिहासाचे, माणसाच्या अस्तित्वाचे मूक साक्षीदार अशा ह्या जागा असतात. त्यात दीपगृहे ही समुद्राच्या काठी एकटी उन्मत्त लाटांना, वादळाच्या थैमानाला, अंगावर घेत अचल उभी असतात. त्यांच्या पायाखाली असतात खडक आणि समोर असतो विशाल दर्या बेभरवशी आणि रहस्यमय...

दीपगृहाची रचना अशी असते की दिवे आणि भिंग ह्यांचा वापर करून दूरवर प्रकाशझोत फेकता येतो. त्याद्वारे सागरी वाहतुकीला धोक्याचा इशारा मिळून योग्य मार्गाचा अवलबं करता येतो. धोकादायक सागरी किनारे किवा उथळ खडकाळ जागी त्यांचा खूप उपयोग होतो. खूप पूर्वी दीपगृह अशी सकंल्पनाच नव्हती. रात्री होणा-या जलवाहतुकीला दिसावे म्हणून उंच जागी शेकोटी पेटवत असत. त्याला थोडे कायमस्वरूपी करण्यासाठी डोंगरावर किंवा टेकडीवर एका चौथ-यावर शेकोटी पेटवून ठेवली जाऊ लागली. आणि मग ही दीपगृह बांधण्यात आली.

इंग्लिश खाडीतून प्रवास करणाऱ्या जहाजांसाठी एडिस्टोन रॉक्स हा खूप धोकादायक भाग होता. तिथले पहिले दीपगृह बांधले १६९६ साली हेनरी विन्स्तन्ली ह्याने. अष्टकोनी लाकडी बांधकाम असलेले हे गृह खालच्या खडकामध्ये बारा लोखंडी तुळयानी रोवले होते. समुद्र आणि आकाश ह्या समोर कुठल्याही आडोशा शिवाय सताड उभा असा हा मनोरा होता. हळूहळू दीपगृहांची देखभाल खूप खर्चिक होवू लागली आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे नवी दिशादर्शक साधनेही उपलब्ध झाल्यामुळे त्यांची गरज कमी होवू लागली. परंतु त्यांना चिकटून निर्माण झालेल्या दंतकथा, रहस्यकथा ह्यामुळे अजून खूप ठिकाणी ही प्रेक्षणीय स्थळे म्हणून अस्तित्वात आहेत. निर्मनुष्य सागरी किनार्यावर एखाद्या पडीक दीपगृहात जिन्यावरून हेलकावत जाणारा कंदील आणि तिथे राहणाऱ्या रक्षकाची एखादी तरी कहाणी आपण ऐकलेली असते.

पण मुळात ही दीपगृहाची सकंल्पना किती आकर्षक आहे नाही? धुंद वादळाची होती रात्र पावसाची...

प्रेयसीच्या मिठीत, उबदार घरात असताना छान हवीहवीशी असते. पण भर समुद्रात पायाखाली खवळलेल्या लाटा, वरून कोसळणारा पाउस आणि विजेचे थैमान चालू असताना? रौद्र लाटांच्या तडाख्यात हेलकावे घेत असलेले, कधीही भरकटू शकेल किवा जलसमाधी घेऊ शकेल असे जहाज, दिशा किवा वेळेचे भान हरवलेले, ह्या परिस्थितीत दूरवरून येणारा प्रकाशाचा झोत दिसल्यावर किती हायसे वाटत असेल ह्याची कल्पनाच करवत नाही. आधीच पाण्यात जहाज आणि जीव दोन्ही घालणाऱ्या नाविकांच्या धडाडीला आणि धाडसाला तोड नाही. म्हणजे कुठल्याच अनोळखी अवकाशात उडी घेणे सोपे नाही. पण काळोख्या रात्री तुफान दर्यामध्ये कुठलीही साधने नसताना पुढे काय वाढून ठेवले आहे ह्याची शाश्वती नसताना जेव्हा दूरवर दीपगृहाचे दिवे लकाकताना दिसत असतील त्या वेळी काय वाटत असेल ते त्या दर्या विरांनाचा ठाउक!

खूप दिलदार असणा-या व्यक्तीला दर्यादिल का म्हणतात ते अशा वेळी थोडे कळते. म्हणजे दर्यासारखे विशाल हृदय असा एक अर्थ आणि दर्यामध्ये स्वत:ला झोकून देण्याइतके अफाट हृदय हे ये-या गबाळ्याचे काम नाही. त्यांच्या निर्भायतेला मदतीचा कणखर हात आणि प्रकाशाची आश्वासक साद देणार प्रकाशघर पाय रोवून उभे असते किनाऱ्यावर एकाकीच!!

- अश्विनी देवधर

---

kw CPRE KELLERWILLIAMS. REALTY

Cell: (425)770-3957
Email: Leena@kw.com
Office: (425)482-6100
Fax: (425)481-2846

Each Office is Independently Owned and Operated

Leena Sathe
Real Estate Broker

NEED HELP WITH REAL ESTATE?

Are you tired of paying high rent & thinking of buying your own home? Or, thinking of purchasing an investment property?

Perhaps, you've accepted a new job and need to sell due to relocation? If this is you and you are in need of a Real Estate Agent who will work for you, then look no further.

Who Am I?

My name is Leena Sathe & I am a licensed Real Estate Broker in the State of Washington who loves to help people achieve their goals.

How can I help?

Using my knowledge and resources I will come up with a personalized plan to help you with your Real Estate needs.

What can I do for you?

-Provide harmony in the home buying experience

-Provide you with the help needed to sell your home in a timely and stress free manner

बांफ जास्पर

प्रिया आणि मला फिरायची फारच आवड. अद्वय आता एक वर्षाचा झाला होता. त्यामुळे कुठेतर जावे असे मनात असताना “बिंग” सर्चवर “मोरेन तळ्याचा” सुंदर फोटो पाहिला आणि आमच्या सहलीवर शिक्कामोर्तब झाला. ३० फूट आर. व्ही. चालवता येईल का या काळजीला "जो होगा सो देखा जायेगा" म्हणत टोला मारला आणि आर. व्ही. बुक केली. मित्र मनिष आणि कुटुंब अशा ७ जणांची मी चोख सहल आखली.

सियॅटल ते कॅलगरी विमानप्रवासाने सुरवात झाली. निरभ्र दिवस असल्याने खाली दिसणाऱ्या हिमाच्छदित डोंगरांचा नजारा प्रियाने लुटला. लग्नानंतर खिडकजवळ बसण्याचा नवऱ्याचा हक्क अपोआप चालला जातो का? विमानात मिळालेले कॉफ्फी स्वादाची बिस्कीटे खाऊन रंगत आली.

कॅलगरीत आर. व्ही. भाड्याने घेवून बाहेर पडलो. रस्त्यावर गाड्यांनी भोंगे वाजवून गाडीचा मुख्य दरवाजा उघडाच राहिल्याचे निदर्शनास आणून दिले. मग काय त्यानंतर, एस.टी.च्या वाहनचालकासारखे, प्रिया तिकीट मार्गदर्शकाकडून सगळे ठीक आहे अशा सूचना मिळाल्यानंतरच आर. व्ही. सुरु व्हायची.

चहा - प्रत्येक प्रवासात न मिळणारी गोष्ट! दररोज २ वेळा चहा बनवून पिणाऱ्या मला आर. व्ही. मध्ये कुकिंग रेंज असल्यामुळे होणारा आनंद तुम्ही ओळखलाच असेल. पावभाजी, छोले, मॅगी असे जेवण प्रवासात मिळाल्यावर अजून काय पाहिजे? आर.व्ही. मध्ये माईक्रोवेव्ह, फ्रीज ह्या सर्वच सोई होत्या. अद्वयला खेळायलाही खूप जागा होती. सर्व ठिकाणी आर. व्ही. साठी खास पार्किंग व्यवस्था असल्यामुळे, छान झाले आर. व्ही. भाड्याने घेतली असे वाटले. जास्परमधील व्हिसलर आर. व्ही. कॅम्पग्राउंडमध्ये राहताना अगदी जंगलात राहतोय असा रोमांच उभा राहत होता.

२ दिवस “योहो नॅशनल पार्क”, २ दिवस “बांफ” आणि ३ दिवस “जास्परला” असा बेत आखला होता. योहो नॅशनल पार्कमधील “टकाकव धबधब्याची” भेट अजूनही अंगाला शहारे आणते. धबधब्याकडे जाणारा रस्ता अचानक डोंगराळ झाला आणि डोंगरकड्यावर एका तीव्र वळणावर आमची आर. व्ही. अडकली. उतार असल्यामुळे मागे जाता येईना आणि मोठी गाडी असल्याने वळतापण येईना. रस्ता तसा सुनसान, एक बाजूला कडा आणि दुसऱ्या बाजूला दरी. अक्षरश: एकेक फूट पुढे मागे करत गाडी वळवली. आता पुढे जायचे की आलो त्या रस्त्याने माघारी फिरायचे असा प्रश्न पडला. एव्हाना एक दोन गाड्या रस्त्यावर जमा झाल्या होत्या. त्यांनी सांगितले कि हेच वळण फक्त कठीण आहे, बिनधास्त पुढे जा. मग आम्हीपण धाडस केले आणि टकाकव धबधब्याला भेट दिली. एखादी लढाई जिंकून झाल्यासारखा आनंद मनात असल्याने १००० फूट उंचीवरून पडणारा तो टकाकव धबधबा अजूनच विलोभनीय दिसत होता. जवळच असलेल्या डोंगरांमधील चक्राकार बोगदा - आगगाड्यांना चढाच्या डोगरांवरून जाणे शक्य करणारा - १०० हून अधिक वर्ष जुना अभियांत्रिकी प्रकल्प पाहून मानव प्रगतीचे कौतुक वाटले.

मोरेन तळं, लुइस तळं, मलिंग तळं हे या प्रवासातील हिरे आहेत. मनाला थक्क करणारे पाण्याचे रंग. गडद निळा, मोरपंखी, हिरवा असे नानातर्हेचे रंग मन मोहून घेतात. इंटरनेटवरील छायाचित्रांपेक्षा प्रत्यक्षात आनंद लुटतांना सुख काही निराळेच. ही सारी हिमानाद्यांची तळी आहेत. खडक आणि पाण्यातील कणांवरून होणाऱ्या दिव्याच्या अपरवर्तनामुळे ही रंगांची किमया दिसते. ह्या जागेची नैसर्गिक सुंदरता अजूनही टिकून आहे. खराब न झालेली सुंदरता येथे नक्की

प्रत्ययास येते. एक कमालीची प्रसन्नता, शुद्धता आणि पावित्र्य येथे जाणवते. वेळ जणू थांबून जातो आणि आपण देवाच्या अविष्कारापुढे नतमस्तक होतो.

बांफकडून जास्परच्या रस्त्यात आपल्याला सोबत देतात ते रॉकीच्या पर्वत रांगा. कित्येक मैल ह्या पर्वतरांगा न दुभंगलेल्या आहेत. टोकदर शिखरे “प्लेट टेक्टोनिक” हालचालींची आठवण करून देतात. उन्हाळा असल्याने अनेक छोटे छोटे धबधबे रस्त्यात दिसतात. अति उंचावरून पडणाऱ्या त्या धारांमधले थेंब जणू कोण पहिले खाली पोचतो याची शर्यत लावतात. "आइस फील्ड पार्क वे" ह्या नावाने हा रस्ता प्रसिद्ध आहे. ह्या रस्त्यावर पुढे हिमनदी लागेल असे कोणी म्हटले तर हसू येईल. पण थोड्याच वेळात मोठ्या "आथाबास्का" हिमनदिचे दर्शन झाले की सुखद धक्का बसतो. प्रत्येक उन्हाळ्यात ह्या हिमनदिवर जाण्यासाठी बर्फात रस्ता बनवतात, ६-७ फूट उंचीची चाके असलेल्या भव्य ट्रक मधून आपण हिमनदिवर जातो तो अनुभव मनात कायम राहतो. काहींनी बर्फाचे ते निर्मळ पाणी प्राशन केले तर काहींनी जवळपासच्या बर्फावर चढून छायाचित्रे काढली. मी ह्या हिमनदीचा विस्तार पाहून माणूस प्रकृतीपुढे किती खुजा आहे अशा विचारात बुडून गेलो.

सहलीच्या प्रत्येक दिवशी निसर्गाची निरनिराळी किमया मंत्रमुग्ध करून गेली, तळ्याशेजारी आर. व्ही. पार्क करून चहा पिलेला क्षण अजूनही आठवतो. मोरेन तळ्याचे उंचावरून काढलेले छायाचित्र अजूनही आठवणी ताज्या ठेवते. जवळून दिसलेले काळे अस्वल, एल्क आजही लक्षात आहेत. झाडांखाली रात्री आर. व्ही. मध्ये राहायला आलेली मज्जा कशी विसरता येईल? मी आणि प्रियाने आत्तापर्यंत पाहिलेली ही सर्वात सुंदर जागा! स्वर्गासम अशी ही जागा बनवण्यासाठी देवाने नक्कीच विशेष लक्ष दिले आहे. हिमनाद्यांची तळी, हिमनद्या, रॉकीच्या पर्वत रांगा, वनजीवन, गंडोला सफर, बोट सफर, हिमनद्यांची सहल या सर्वांनी भरलेली ही जागा एक नंबर आहे.

- आमोद सामनेरकर

चित्रकार-अर्चना साठ्ये

चित्रकार-अर्चना साठ्ये

प्रतिबिंब

"वॉशिंटन लेकच्या" निळ्याशार आणि थंडगार पाण्याच्या लयदार काठावर विसावलेले "सियॅटल" हे टुमदार गाव. "लेक सिटी" ही ह्या गावाची ओळख. गावातून कुठेही फिरा बर्फाच्छादित "माउंट रेनियर" हा गावाचा मानबिंदू. सहा महिन्याचा कालावधी म्हणजे तसा मोठाच. करमेल का? काय करायचे? वगैरे प्रश्न मनात आले तरी मुलांसोबत आपला वेळ मजेत जाईल ह्याची खात्री होती आणि नातवंडे म्हणजे दुधावरची साय!

अमेरिकेची वारी म्हणजे हिंडणे-फिरणे, निसर्ग डोळा भरून बघणे, तिथली थंडी, पाऊस अनुभवणे. प्रशस्त पसरलेल्या आणि नावाला साजेश्या अशा प्रशांत महासागरावरील सफर करणे. तिथल्या फुलांना आणि उंच झाडांना आपल्या कॅमेरात बंद करणे. "वा ss काय सुंदर आहे", असे म्हणत तिथल्या स्वच्छतेचे आणि टापटीप, नेटकेपणाचे कौतुक करणे, मॉलच्या भव्यतेचे आणि मार्केटिंगचे कौतुक करणे ओघाने आलेच. दक्षिणोत्तर आणि पूर्वपश्चिम अमेरिकेला जोडणारे रस्ते आणि त्यावरून सुसाट धावणाऱ्या गाड्या, भोंगे एकदाही न वाजवता ताशी ८० ते १०० च्या वेगाने जाणाऱ्या गाड्या म्हणजे अमेरिकन गती -प्रगतीची साक्ष! आता तिथल्या खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेणे हे ही योगाने आलेच पण तेथेही भारतीय पदार्थांवर यथेच्छ ताव मारता आला तर आपल्याच घरी जेवल्याचा आनंद आणि समाधान मिळते. आणि हे सारे तोंड भरून सर्वांना सांगणे म्हणजे अमेरिकन वारीची इतिश्री...असे पर्यटकांना वाटत असले तरी या पलीकडे मला भावलेली अमेरिका ही वेगळीच!!!

दैनंदिन जीवनातील घटकांची ओळख म्हणजे खऱ्या अर्थाने जीवन जवळून बघणे. माझे ४० वर्षाचे अध्ययन आणि अध्यापन ह्याचे अनुभव इथे काही उपयोगी पडतात का? असे वाटून इथल्या गुरुकुल मध्ये आम्ही दोघींनी प्रवेश केला. आम्ही दोघी विहिणी विहिणी. विहिणी पेक्षा बहिणीच अधिक. मराठी गुजराथी, हिंदी भाषांचे चाललेले अध्यापन, त्यांचे उपक्रम, अभ्यासक्रम पाहून तर आम्ही थक्कच झालो. मातृभाषेची गोडी थोडीही कमी होऊ न देता चाललेली ती धडपड कदाचित भारतातील धडपडीपेक्षा जास्त असल्याचे जाणवले . तिथल्या वार्षिक स्नेहसंमेलनात सहभागी झालो आणि तेथील शिक्षकांचे कौतुकच वाटले. कोणत्याही मानधनाशिवाय आपला वेळ देणारी ही पिढी भारतीय परंपरांचा आदर करणारी म्हणून खूप खूप आवडली.

नव्या पिढीने म्हणजेच तरुणाईने पाश्चात्यांच्या अनुकरणातून काही भले बुरे शिकू नये अशी भीती सगळ्याच पालकांच्या मनात असते. पण इथे सगळेच वाईट नाही, चांगलेही आहेच. आपल्या मुलांना नियमांच्या जाचकतेत न बांधून ठेवता हसत खेळत चालणाऱ्या चिन्मय मिशनच्या शाखा, संघ शाखा, कुटुंब शाखा हे पाहून तर आम्ही थक्कच झालो...अरे हे तर आम्ही इथे भारतात विसरत चाललो आहोत!!!

महाराष्ट्र मंडळातून होणाऱ्या कार्यक्रमांनी तर दर्जेदार साहित्तिक ऋणानुबंध जपले आहेत. सुगम संगीत शास्त्रीय संगीत, नाटकाचे दौरे, स्थानिक कलाकारांची अदाकारी या आणि अन्य उपक्रमांतून संपूर्ण अमेरिकेत एक सांस्कृतिक चळवळ उभी आहे असे वाटते. शाळांचा दर्जा पालकांच्या सक्रिय सहभागातून ठरतो. ज्या शाळांमध्ये पालकांचा अधिक सहभाग, त्याशाळा अधिक उपक्रमशील ठरतात. जे चित्र आपल्या भारतीय शाळांमध्ये आजीबात नाही. इथल्या शाळा अधिक क्रियाशील वाटल्या कारण सगळे शाळेच्या किंवा सरकारच्या माथी मारून स्वस्थ बसणे अशी इथल्या पालकांची मानसिकता दिसली नाही.

मुलांना मैदानी खेळ, बैठे खेळ शिकवण्याची पालकांची धडपड तर थक्क करणारी आहे. सगळ्यात आवडले ते इथल्या वातावरणाने सगळ्यांना दिलेली आरोग्याची समज. वास्तविक देश कोणताही असो, आपण कुठेही राहत असो आपले आरोग्य आपल्यालाच सांभाळायचे असते. का माहित नाही, पण देशादेशांचेही वैशिठ्य असते, तसे इथले वैशिष्ठ्य म्हणजे वय आणि वजनाचे गणित. वयाची आणि वजनाची सांगड घालत आरोग्य जपणारी इथली पिढी निरोगी जीवन जगतांना दिसते. अगदी वय व र्ष ५ चा छोटाही वय आणि वजनाच्या गप्पा मारतो. स्वतःच्या आरोग्य बाबतची जागरुकता किती महत्वाची आहे हे "L. A. Fitness Center" च्या पायऱ्या चढता - उतरतांना मनात येऊन जात असे.

संगीतसाधना आहे, आरोग्य जपणे आहे, शाळा व्यवस्थापन आहे, मातृभाषेची साधना आहे, घराघरातून संस्कार वर्ग आहेत, संस्कृत भाषा वर्ग आहेत, विद्या भारती केंद्र आहे, गीता अध्ययन आहे, ज्ञानोबा माउलीच्या ज्ञानेश्वरीची पारायणे आहेत, दासबोधाची चर्चा आहे, विवेकानंदांचा विवेकी विचार आहे, तुकोबांची गाथा आहे, उपनिशादांचे सार आहे, सर्वकाही इथे आहे. महत्वाचे म्हणजे भारतीय तरुणांची अमेरिकन व्यवस्थापनातही सर्वदूर भरारी आहे. त्यांचे हे कौशल्य फक्त "बे – एरिया", आणि तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाही तर व्यवसायापासून व्यवस्थापनापर्यंत आणि सामान्य नागरिकांपासून असामान्य कर्तृत्वापर्यंत सर्वदूर दिमाखाने वावरणारे भारतीय युवक अभिनंदनास आणि कौतुकास पात्र आहेत.

सलग ४०-५० वर्षे वास्तव्यास असणाऱ्यांची २ व ३ री पिढी आता अमेरिकेत आहे. देश बदलला, वेश बदलला, भाषा बदलली, दिशा निवडली, तरी संस्कारांची ओढ, तिची पाळेमुळे भारतीय आहेत हे नक्कीच कौतुकास्पद आहे,आनंददायी आहे. आणि म्हणूनच सियॅटलच्या निसर्गाइतकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक भावले ते सियॅटलचे भारतीय असलेले हे भारलेपण.

- ज्योती पिटके



चित्रकार-अर्चना साठ्ये

बायकांचा विठोबा आणि कार्तिकस्नान

काय मंडळी, लेखाचे नाव वाचूनच आश्चर्य वाटले ना? पण सिॲटल मराठी मंडळाच्या पत्रकात सारथी दिवाळी अंकाची घोषणा वाचली आणि दिवाळी जवळ आल्याचे जाणवले. वाटले की चला दिवाळीबद्दलच काहीतरी लिहावे. इथे अमेरिकेत आपले सगळे पारंपरिक सण आपण जमेल तसे साजरे करतो. आता भारतातही दिवाळी साजरी करायचे स्वरूप पार बदलून गेलंय. पण माझ्या लहानपणीची, सोलापूरची, दिवाळी आताच्यापेक्षा एकदम वेगळी होती. जरा हटके होती. चला तर मग माझ्याबरोबर, माझ्या आठवणींच्या गावची एक चक्कर मारायला.

आमचे सोलापूर तसे एक छोटे गाव. हो, म्हणजे कागदपत्रांवर ते मोठे शहर, रेल्वे जंक्शन वगैरे आहे, तिथे बरेच बदलसुद्धा झालेत अलिकडच्या काळात. पण अजूनही ते जुन्या गल्ली-बोळांचे, हेल काढून बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेचे, आणि कानडी-मराठी संस्कृतीची लेणी लेवून नटलेले छोटेखानी गावच आहे. तिथे आम्ही अगदी गावभागात राहायचो. तिथल्या एका वाड्यात एक छोटेसे, घरगुती असे विठ्ठलाचे देऊळ होते. त्या वाड्याच्या मालकांचे आडनाव संत, त्यामुळे त्याला संतांचा वाडा किंवा संतांचा विठोबा म्हणले जाई. पण का कुणास ठाऊक या देवळातल्या सगळ्या कार्यक्रमांना बायकाच जास्त येत. कोजागिरी पौर्णिमेपासून ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत महिनाभर अनेक कार्यक्रम होत. त्यात पहाटे काकडआरती, मग दासबोध वाचन, ज्ञानेश्वरी वाचन वगैरे कार्यक्रम, आणि रात्री शेजारती होई. सगळ्या कार्यक्रमांची आखणी, नियोजन, आणि प्रत्यक्ष कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी गल्लीतल्या बायकांचीच असे. कदाचित त्यामुळेच या देवळाचे नाव "बायकांचा विठोबा" असे पडले असावे. आम्ही लहान पोरंटोरं बऱ्याचदा आरतीचा प्रसाद खायला आणि नुसते मिरवायला देवळात जात असू. पण कळत नकळत कार्तिकस्नान माझ्या बालपणीच्या दिवाळीचा एक अविभाज्य भाग झाले आणि कायमचे मनात घर करून राहिले.

आमच्या घरी दरवर्षी आषाढी एकादशीला सुरू होणारा धार्मिक महोत्सव कार्तिकस्नानानेच संपायचा. सतत एकामागोमाग एक असे सण-वार, व्रतवैकल्ये चालूच असायची. आई पहाटे चार-साडेचारला उठून काकड्यासाठी तयारी सुरू करायची. पूजेचे तबक हळद-कुंकू, गंध-अबीर-गुलाल, फुले, अक्षता, तुळशीच्या मंजिऱ्या, धूप-दीप, नैवेद्य यांनी सजलेले असे. अस्मादिक दिवाळीच्या कडाक्याच्या थंडीत पांघरूणातून बाहेर पडून, डोळे चोळत, चार तांबे अंगावर ओतून साडेपाचपर्यंत कसेबसे तयार होत असू. पण काकडा इतका आवडायचा की पहाटेच्या साखरझोपेची कसर दुपारी भरून काढली जायची. देवळात जाईपर्यंत अगदी धीर धरवत नसे. मग तिथे पोचल्यावर साधारण जागा ठरलेल्याच असत. प्रत्येकीने आणलेले पूजेचे साहित्य एका मोठ्या तबकांत जमा होई आणि काकड आरतीला सुरूवात होत असे.

साधारण २५-३० माणसे बसतील इतका मोठा सभामंडप. त्याच्या एका बाजूला गाभारा असा नाही पण जरा बंदिस्त चौथरा, त्यावर चार कोरीव खांब, समोरच्या दोन खांबांवर नक्षीदार कमान, तिला महिरप होती. चौथऱ्यासमोर खाली जमिनीवर पितळ्याचं कासव आणि छतावर टांगलेली एक जुनाट पितळी घंटा असे या

मंदिराचे साधे स्वरूप. चौथऱ्यावर दोन बाजूंस अखंड तेवणारे लामणदिवे आणि मधोमध दोन-अडीच फूटी अगदी पिटुकल्या म्हणाव्या अशा विठ्ठल-रखुमाईच्या काळ्याकभिन्न पाषाणाच्या रेखीव मूर्ती. आजही हे सारे अस्से नीट डोळ्यासमोर उभे राहिलेय.

या कार्तिकस्नानाची सुरूवात काकड्यानेच होई. काकडा म्हणजे कापसाची जाडजूड, दोरखंडासारखी वात तुपात भिजवून त्याने देवाला ओवाळतात आणि त्या आरतीला काकड आरती म्हणतात. पण आम्ही मुले थंडीने कुडकुडत, काकडत केलेली आरती ती काकडआरती असे म्हणत असू. जमलेल्या बायका भक्तिभावाने ओथंबल्या स्वरांत "काकडआरती उजळु माझ्या कृष्णा सबाहया, माझ्या रामा सबाहया, चराचर मोहरले तेजोमूर्ती पाहावया" किंवा "काकडा झाला रामा आता उठावे, येऊन विनया तनया दर्शन दासासी द्यावे" असे म्हणत त्याला जागे होण्याची विनवणी करत. मग "उठोनिया प्रात:काळी वेगे जाऊ राऊळासी, जळतील पातकांच्या राशी काकडारती देखिल्या" किंवा "उठा जी मायबाप, उठी की जी मायबाप, कशी लागली झोप, हुजुर जाऊनियां एवढी चुकवां खेप, उठा जी मायबाप" किंवा "प्रभात समयो पातला आता जागवा विठ्ठला" सारखी गाणी, पदे गायली जात आणि वेगवेगळ्या पट्ट्यांमधून निघणाऱ्या सुरावटींनी या पंढरीरायाची यथासांग पूजा बांधली जाई. कोणी एक मावशी/काकू विठ्ठलाच्या बाजूला आणि दुसरी एखादी रखुमाईच्या बाजूला उभी राहून प्रेमाने षोडशोपचारे पूजा करत. बाकीच्या बायका त्यांना लागेल तशी मदत करत. आम्हा मुलींची नेमणूक हार-गजरे, रांगोळी इ. कामांवर होई. एका तांब्याच्या घंगाळ्यात गरम पाणी ठेवलेले असे. मग सावकाश आधीची वस्त्रे, निर्माल्य काढून विठुरायाला गरम दुधा-पाण्याची आंघोळ घातली जाई. दिवाळीच्या चार दिवसांत पंचामृताची आंघोळ आणि केळ्याचा साबण पण मिळे. मग परत गरम पाणी. त्यानंतर मऊ मलमलीच्या कापडाने नीट पुसून वीत-वीत उंचीचे कपडे त्यांना चढवले जात. विठोबाला शिवलेले पीतांबर, वर बाराबंदी, आणि दोन हातांमधून गुंफलेले जरीचे उपरणं. डोईवर कधी लहानसा फेटा, टोपी तर स्पेशल दिवशी पुणेरी पगडी असे आणि इवल्याशा रखुमाईच्या साड्या अगदी कल्पना साडी स्टाईलच्या. कधी खणाच्या तर कधी एकदम जरतारी. साडीच्या चिमुकल्या पदराच्या २-३ निऱ्या काढून चापूनचोपून बसवल्या जात. मग आपण रोज जसे तयार होतो अगदी तस्सेच त्यांनाही नटवले जाई. विठोबाला गंध, चंदन, बुक्क्याचा टीळा. तर रखुमाईला हळद, कुंकवाची चिरी, कधी चंद्रकोर, डोळ्याला समईवरचे ताजे काजळ, डोक्यावर शेवंतीची नाहीतर अबोलीची वेणी माळली जाई. दोघांना सुवासिक फुलांचे हार, तुळशीहार घातले जात. सणाच्या दिवशी वाड्याच्या मालकीणबाई एका संदूकीतून चार दागिने काढून देत. तेही चढवले जात. मग अत्तराचा हलकासा फाया देखील लावला जाई. अन् काय सांगू मंडळी हे सजवणे, नटवणे आम्ही मुली अगदी निरखून एकटक बघत असू. लहान असताना यामागची भावना समजायची नाही पण जसे जसे मोठे होत गेलो तसे तसे त्या उपचारांमागची श्रद्धा आणि विश्वास दिसायला लागला. त्यामधले कौशल्य, कलात्मकता समजली. त्या सगळ्या काकू, मावश्या, आजा घरादाराचे व्याप सांभाळून भल्या पहाटे या विठूरायासाठी जमत. त्याला आपले मूल मानून तर कधी आपला सखा मानून नटवत. तो प्रत्यक्ष आलाय असे समजून त्याचे लाड करत. धूप-दीप दाखवून "काढू दे रे दृष्ट गोविंदा, कुरवाळी मुख हरि माता, गाईन गानछंदा, पाहुनी नेत्रसुखकंदा" असे म्हणत त्याची दृष्ट काढत. अशावेळी एखादी आजी आपल्याजवळ बसलेल्या नाती-नातवाची चार बोटे ओवाळून दृष्ट काढे. फार निरागस आणि सात्त्विक दृश्य असे ते!

पांडुरंगाला सजवताना -
"हरीला आवडे तुळशीपान, प्रभुला आवडे तुळशीपान, कटिला पीतांबर जांभळा शेला, कपाळी केशरी गंधही छान हरीला आवडे तुळशीपान, प्रभुला आवडे तुळशीपान" किंवा "लोणीसाखरेची वाटी आणू पांडुरंगासाठी, चला जाऊ झडकरी, विटेवरी उभी स्वारी, चरणाशी घालू मिठी, आणू पांडुरंगासाठी, भाग्योदय हेचि झाला, देखियेले विठ्ठलाला, झाली जन्म-मरण तुटी, आणू पांडुरंगासाठी" ही आणि अशी अनेक पदे म्हणत. वेद-उपनिषदांमधील तत्त्व या संतमहंतांच्या पदातून नकळत कानावर पडे. ही गाणी संपेपर्यंत एव्हाना आम्हा मुलांना मात्र जरा कंटाळा येई आणि बरीच भूकही लागलेली असे. मग नैवेद्य येई. अगदी बरोबर त्यावेळेपर्यंत "कर्माबाईची ऊन ऊन खिचडी, शिरा-पुरी घे ना सख्या रे हरी, जेवी हो सगुणा "किंवा" चिन्मय मन देवा पहाट झाली सत्वर, देवा घ्यावी लोणीसाखर" अशी "चविष्ट" गाणी येत. मग काय आमची स्वारी आरती कधी संपतेय आणि प्रसाद कधी मिळतोय याचीच वाट बघण्यात गुंग! दिवाळीच्या चार दिवसांत या पदांमधे वैराग्याचा लाडू, सत्वगुणी करंज्या, आणि भावभक्तीचे चिरोटे पण येत आणि नैवेद्याच्या ताटात प्रत्येकीच्या घरी बनत असलेल्या फराळाची भर पडे. जेवण झाल्यावर देवाला "विडा घ्या हो नारायणा, कृष्णा जगज्जीवना, विनविते रखुमाई, दासी होईन मी कान्हा" असं म्हणून चतुर्दशगुणी गोविंदविडा समोर मांडला जाई. मग मोठी आरती, मंत्रपुष्पांजली वगैरे होऊन काकड्याची सांगता होई. या आरतीच्यावेळी गणपती, देवी, शंकर, दत्त, पांडुरंग या नेहमीच्या प्रचलित आरत्यांबरोबर संत ज्ञानेश्वर आणि संत तुकारामांची देखील आरती होई. मग प्रसादाची मुगाची खिचडी, लोणीसाखर, गोपाळकाला, फराळाचे पदार्थ खाऊन आम्ही तृप्त होत असू. सगळ्यांच्या घरातून मूठ-मूठ शिधा येऊन तयार झालेल्या खिचडीची, त्या गोपालकाल्याची चव शब्दातीत असे. आजही ती जिभेवर रेंगाळत आहे. हे सर्व होईपर्यंत सात-साडेसात वाजून जात. मग कुणीतरी दासबोध वाचन वगैरे सुरू करत आणि आम्ही खेळायला, फटाके फोडायला मोकळे.

महिनाभर चाललेल्या या कार्यक्रमाची त्रिपुरारी पौर्णिमेला भंडाऱ्याच्या प्रसादाने समाप्ती होई. शे-दोनशे जणांचा स्वयंपाक तिथेच वाड्यात चुली मांडून त्यावर चाले. याचे नियोजन मात्र पुरूष मंडळी करत. चुलीवरच्या मोठमोठाल्या कढयांमध्ये भात, भाजी, तिखट आमटी, आणि गव्हाची हुग्गी शिजवून पंक्तीच्या पंक्ती उठत. आम्ही वानरसेना पहिल्या पंगतीला जेवून मग स्वयंसेवकगिरी करत असू. द्रोण-पत्रावळी मांडणे, पाणी वाढणे (किंवा सांडणे) हे आमचे मुख्य काम. आणि पंगत बसली की स्वच्छ, खड्या आवाजात श्लोक म्हणणे हे दुय्यम काम असे. खूप धमाल येई तेव्हा. लाजरी-बुजरी मुले अजून घाबरून गडबडून जात आणि चुणचुणीत, हुशार मुले उगीचच भाव खात. गमतीजमती करत, हसत-खेळत भंडाऱ्याचा कार्यक्रम पार पडे. सगळीकडे कसे आनंदाचे, समृद्ध वातावरण असे. आता विचार केला की वाटते, का मोठे झालो आपण? ते जे होते ते किती साधे, सरळसोट होते. कशाची काळजी नाही. कशाची चिकित्सा नाही. अगदी "बालपणीचा काळ सुखाचा" सारखे फुलपाखरी दिवस होते.

पुढे वय आणि अक्कल वाढल्यावर (आईच्या भाषेत शिंगे फुटल्यावर) या सगळ्या उपचारांना बुद्धीप्रामाण्याची म्हणजेच "लॉजिकची/प्रॅक्टिकल ॲप्रोचची" कसोटी लावण्यात आली आणि तिथेच हळूहळू बालपण सरले. वाढत्या वयाबरोबर विचारांच्या कक्षा रुंदावत गेल्या आणि तसा आमचा विचारपालटही झाला पण तिथे जमणाऱ्या सगळ्या श्रद्धाळू, भाविक बायकांची त्या विठुरायावर अपरंपार माया होती. त्यामागची त्यांची

भावना खरी होती. समईच्या प्रकाशात तेजोमय झालेला राजस, सुकुमार असा पांडुरंग त्यांच्यासाठी मदनाचा पुतळाच होता. त्याची वामांगी, देखणी रखुमाई सखी होती. काळ्याकभिन्न पाषाणाच्या रुपांत त्यांचा परमात्मा त्यांना भेटत होता. "निर्गुणाचे भेटी आलो सगुणा संगे" असे म्हणत त्या निर्गुण, निराकार परब्रह्माला भेटण्यासाठी सगुण साकार रुपातली ती मार्गक्रमणा होती. अशी तेजोमय दिवाळी पुन्हा कदाचित मिळणार नाही पण आठवणींच्या शिंपल्यात ते मोती साठवून ठेवले आहेत. खंत नाही पण हुरहुर मात्र नक्कीच आहे. जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल!!

- धनश्री केळकर

अस्तित्व

दुधाला तरी काय ठाऊक, त्यात
कोण कोणाचे, अस्तित्व असते
त्याला अग्निपरीक्षा दिल्यावर
साईचे अस्तित्व काळात असते

साय दुधाला सोडून, स्वतःच
अस्तित्व गाजवत असते
तिला अग्निपरीक्षा दिल्यावर
तुपाच अस्तित्व काळात असते

तूप दुधाला, साईला सोडून स्वतःच
अस्तित्व मिरवत असते
तूप, होम हवन मध्ये स्वतःच अस्तित्व
नष्ट करीत असत
आणि धूर रूपाने मनुष्य प्राण्यास मोक्ष देत असत
मोक्ष देत असत, मोक्ष देत असत

- अ. के. राठोड

MAHARASHTRA FOUNDATION, USA

PO Box 2287, Church Street Station, New York, NY 10008-2287
Under IRS Section 501 (c)(3) - Tax ID: 22-2213611

An NGO in Special Consultative Status with the Economic and Social Council of the United Nations

Thanks to Seattle Maharashtra Mandal for the outstanding support to the "Save Indian Farmers" initiative by MF and BMM

All of you can help the survivors of the farmers in Maharashtra that committed suicide by supporting the "Adopt-a-widow" project. Your $500 can save a family for one year.

Support eight other projects in 2016 undertaken by MF. For more information, visit www.maharashtrafoundation.org

Celebrate major milestones in your life by bringing a smile into the life of someone in need!
Make your tax deductible contributions to an organization of your choice in India.

Contact: Vaibhav Sathe, vasathe@me.com, 678-513-2750
Local MF Volunteers Contact in Seattle: Arti Lotlikar or Shraddha Deodhar-Oak

Bhalchandra Bhopatkar

The month of April brought me a series of sad news one after the other. First, my uncle Kama Kaka died on 12th, followed by my mother-in-law Rashmi Kaku on 15th, followed by Bhopatkar Kaka on 19th. All of these people had reached the ripe age of 80 and had passed away after living rich and full lives. Their deaths were certainly big personal losses to me, but still, the passing of these stalwarts seemed like part of an inevitable, natural process. And yet, I remember clearly, Bhopatkar Kaka's death felt like a surprise. It felt as if a young man had been snatched away by providence prematurely, a young man who was still in his prime, in the middle of serious action.

My impression of Bhopatkar Kaka was that of the real *Dev Anand*[1], a young man to his very end. I knew Bhopatkar Kaka as a man who had a pleasant and lively personality, someone who always greeted me with a big smile and the part-jovial, part-adulatory address of *Abhay Raje* (Prince Abhay!). I knew him as a man who enjoyed alike the big and the small pleasures of life – an ample proof of which was our last year's trip together when I drove my parents and Bhopatkar Kaka and Kaku (his wife) to the Hare Krishna temple in Issaquah. Once there, Bhopatkar Kaka got busy admiring the temple's architecture, the numerous paintings of Krishna hanging on the walls inside, and the temple's various features and services. His enthusiasm was no less than that of a curious school student who is hungry for knowledge.

True to his "forever-young" nature, Bhopatkar Kaka was fiercely self-reliant – he went about doing his activities and work on his own, sometimes alone if necessary. He traveled a lot, and stayed alone in hotels if required. He often visited my house in Pune to call upon his friend – my father – and if I was present at such meetings, I offered him a ride in my car back to wherever he was staying. But, he always insisted that I dropped him at the nearest auto-stand or a convenient bus stop.

Bhopatkar Kaka understood and appreciated the importance of friends and relations in life. He also appreciated the fact that relationships don't just flourish on their own; they require nourishment, investment of effort and time, acts of affection. In today's world of "networking" which is all about making connections for hidden motives of furthering career or business interests, Bhopatkar Kaka's style of genuine, loving, and selfless social networking was very endearing.

This quality of "active socialization" is actually quite hard to practice as you get old. Indeed, we see so many old people becoming aloof, bored, indifferent, and lonely, even though they still have many friends and relatives. Bhopatkar Kaka did not fall in this trap and expect

friends to come to him. He proactively sought people, built new friendships – with young and old alike, and kept in touch with them from wherever he was. He called friends on the phone, visited them, brought cakes to their birthdays, sent them New Year greeting cards. Long after the world had stopped exchanging letters and cards, Bhopatkar Kaka continued this wonderful and intimate tradition. I still have the New Year card he sent to me this year, in which he has expressed his affection for me in his own hand-writing. Last year, he personally carried a birthday cake to Rashmi Kaku (my mother-in-law) with whom he shared his own birthday!

Bhopatkar Kaka lived his life, to the very end, like a simple, middle-class Indian man. This was a matter of personal choice, not an exigency forced by financial wherewithal. He understood the importance of simplicity, of living frugally, of the power of money when it is applied to addressing social inequities. He dressed simply, and wherever he went he took auto-rickshaw, public transport, whatever means were available to the common people. I believe when he traveled in Mumbai he loved hiring those creaking age-old yellow cabs.

When I met Bhopatkar Kaka first he had already retired from active service and had dedicated himself to the cause of women's education. He was actively involved, to his very end, in running night-schools in Mumbai for women who worked (often on menial jobs) during daytime. He helped numerous girls and women rise from poverty and desolation by offering them the opportunity to educate themselves and seek better opportunities and make superior life choices. He worked relentlessly for this cause, talked with people who seemed interested and sought their participation. I was one of those folks who find it easy to write small checks and feel involved in "social cause", and Bhopatkar Kaka sent me periodic newsletters about his schools and shared news of his girls' progress. In fact, the last letter I have from him (the New Year card) contained a list of girls who had shined in a local state-wide aptitude test.

I must share an interesting example of Bhopatkar Kaka's never-dying desire to stay involved with social causes. During one of his trips to the US, the unfortunate episode of Columbine happened when several high school students were gunned down by a couple of their own school mates. The country was in a shock and everyone was discussing the matter with great agitation. Bhopatkar Kaka didn't just content himself with the gossip, but got together with my father and proposed that they should write a letter to the US president (Bill Clinton) and suggest to him some ideas based on the Indian model (whatever it was!). They actually followed through this proposal and mailed a letter to the White House!

Bhopatkar Kaka knew no malice. I never saw him malign anybody with bad words, make fun of anyone on his back, or discuss anyone's

shortcomings. He preferred to stay positive, focus on the goodness in each person, enjoy every person's company purely for its human worth, and do as much good as possible. In contrast to many people that perform "social work" Bhopatkar Kaka did not seem to have developed cynicism and tendency to criticize.

I do hope that I am able to practice at least a fraction of this unique flavor of Bhopatkar Kaka's youthfulness when and if I become a ripe old man!

Foot-notes:
1. Dev Anand is a Bollywood star who was known for his ever-green youthfulness.

Photo taken during Bhopatkar Kaka's last visit to Seattle (2014). This photo was taken in front of the Hare Krishna temple in Sammamish. From left: Bhopatkar Kaka and Kaku, Mrs. Asha and BG Joshi (my parents who were visiting around the same time).

- Abhay B. Joshi

मैत्री

मैत्री म्हणजे कट्ट्यावर बसून एकत्र प्यायलेला तो कटिंग
चहा नि एकमेकांची केलेली मस्करी तर कधी
एकमेकांबद्दलची वाहवा मैत्री म्हणजे कधी बालिशपणा
तर कधी गाठोडे खूप साऱ्या अनुभवांचे जखमेवरची
नाजूकशी फुंकर तर कधी मिळालेले उत्तर अवघड प्रश्नाचे

मैत्री म्हणजे सुखाचा गुणाकार आणि दुःखाचा भागाकार
नि होत असतो कृष्ण - सुदाम्याच्या स्नेहाचा साक्षात्कार
मैत्री म्हणजे असं नातं जिथे औपचारिकतेला कसली जागा
नसते वेळ पडली तर कानउघडणी नि थाप मात्र
शाबाशकीचीच असते

मैत्री म्हणजे आल्हाददायक, उबदार आणि निखळ अशी
दोस्ती नि दमलेल्या मनाला हवीहवीशी वाटणारी काही
क्षणांची उसंती मैत्री म्हणजे एकत्र केलेली मजा, मस्ती,
रुसवे, अबोला आणि गाऱ्हाणी त्यापलीकडे जाऊन पुन्हा
एक होऊन मिटवून टाकलेली मनामधली दरी

- अर्चना साठ्ये

तेजास शोधतो मी

धागे क्षणाक्षणाचे जुळवून गुंफतो मी
माझ्या मनातला हा निशिगंध पोसतो मी

काळोख पिऊनिया मनडोह शांत होई
छाया मुक्या मनाची, प्रतिबिंब त्यात होई
स्पर्शात वादळांच्या, आव्हान झेलतो मी.....

जगते असंख्य रेती, येथेच वाळवंट
ज्वाळात यातनांच्या, जळती मने अफाट
राखेत विस्मुतींच्या, अंगार चेचतो मी.....

लपले अनंत दुःख होऊनी बंदिवान
नयनात आर्जवांची अतृप्तशी तहान
त्या पापण्या निमाल्या, तेजास शोधतो मी...

- कै. श्रीराम पिटके

आम्ही सारे खवय्ये !

Instant च्या आजच्या जमान्यात सणांना , घरगुती कार्यक्रमाना अनेक Snacks आणि Desserts केले जातात. अतिशय रुचकर आणि सोपे असे काही चविष्ठ पदार्थ नक्की try Karun पहा!

बीटचा हलवा

साहित्य: १/२ किलो बीट (उकडलेले), पाव किलो साखर, dryfruit भरड १ वाटी, वेलची पावडर चवीप्रमाणे अंदाजे १ चमचा, १ कप दुध, १ डाव तूप.

कृती: प्रथम कढईत तूप घालून उकडून किसलेले बीट परतून घ्यावे. २ वाफांनंतर त्यात १ कूप दुध व dryfruit भरड आणि वेलची घालून परत परतावे. मिश्रण थोडे घट्ट झाले कि साखर घालून ढवळावे. हा हलवा Microwave मधेही छान होतो हा हलवा. Hemoglobin वाढविण्यास अतिशय उपयुक्त आहे.

भाज्यांचे कबाब

साहित्य: ४ उकडलेले बटाटे, ४ वाट्या फ्लॉवर, कोबी, मटार, गाजरचे मिश्रण, १०० ग्रॅम पनीर, २ कांदे, आला लसुण पेस्ट १ चमचा, गरम मसाला १ चमचा, १ चमचा लिंबू रस, मिरची, कोथिम्बिर व मीठ आवडीप्रमाणे, १/२ वाटी खवलेला नारळ, १ वाटी मैदा, तळणीसाठी तेल, १ चमचा जिरपूड.

कृती: प्रथम सर्व भाज्या स्वच्छ धुवून गरम पाण्यात थोड्या blanch कराव्या. त्यानंतर उकडलेला बटाटा, ब्लांच केलेल्या भाज्या, चिरलेला कांदा, आल लसूण पेस्ट, मिरची, मीठ, पनीर, लिंबू रस, कोथिंबीर, नारळ, घालून मिश्रण एकजीव करावे. त्यानंतर त्यात मैदा घालून मध्यम असे पीठ भिजवावे. या पिठाचे गोळे तेलात तळून सॉस अगर चटणी बरोबर खायला घ्यावे . ह्या कबाब मध्ये कुठल्याही आवडीच्या भाज्या घालू शकतो. एकत्रित भाज्या पोटात जाण्याचा सोपा उपाय !

लाल भोपळ्याची खीर

साहित्य: पिकलेल्या लाल भोपळ्याचा कीस २ वाटी, दुध ३ वाटी, साखर १ वाटी, dryfruit ची भरड, तूप १ वाटी , वेलची पूड, चारोळी.

कृती: प्रथम एका कढईत १ डाव तूप घेऊन धुवून घेतलेला भोपळ्याचा कीस परतावा. त्यात थोडे गरम दुध घालावे. साध्या दुधा एवजी condensed मिल्क चाही वापर होऊ शकतो. अशावेळी साखर चवीप्रमाणे घालावी. मिश्रण थंड झाले कि त्यात dryfruit ची भरड, वेलची पूड, चारोळी घालून मिश्रण सजवावे. काहीना खीर गार आवडते तर काहीना गरम. आवडीप्रमाणे serve करावी. ही खीर पौष्टिक, सोपी व रुचकर आहे.

मिश्र डाळींचे वडे

साहित्य: १/२ वाटी चणा डाळ, १/२ वाटी उडीद डाळ, पाव वाटी मसूर डाळ, मुठभर तूर डाळ, १/२ वाटी मुग डाळ, १ बारीक चिरलेला कांदा, आला लसुन पेस्ट, मीठ, १ चमचा गरम मसाला, कोथिंबीर १ वाटी, १ डाव तांदूळ पीठ, तळणीसाठी तेल .

कृती: दिलेल्या सर्व डाळी ५ ते ६ तास पाण्यात भिजवून बारीक वाटून घ्याव्यात. त्यात १ बारीक चिरलेला कांदा,

आला लसुन पेस्ट, मीठ, १ चमचा गरम मसाला, कोथिंबीर १ वाटी घालून मिश्रण एकजीव करावे. २ चमचे गरम तेल घालून घट्ट भिजवलेले मिश्रण १० मिनिटे बाजूला ठेवावे. तयार मिश्रणाचे छोटे वडे करून तांदुळाच्या पिठात घोळवून तेलात तळावे. चिंच-गुळाच्या चटणी बरोबर अथवा sauce बरोबर वडे खावेत. वर दिलेल्या डाळी available नसतील तर त्यात भिजवलेल्या कडधान्यांची भरडही घालता येते. चमचमीत आणि रुचकर वडे कुठल्याही कार्यक्रमाला starter म्हणून योग्य !

स्वयंपाकघरातील काही उपयुक्त कानमंत्र:

१) पालेभाज्या हिरव्या राहण्याच्या दृष्टीने शिजायला टाकण्यापूर्वी त्यात एक चिमुटभर मीठ टाकावे.

२) केळीचा घड प्रथम ओल्या फडक्यात गुंडाळून पोलीथीन पिशवीत ठेवून रबरबंद करून Fridge मध्ये ठेवल्यास ६/७ दिवस केळी ताजी राहतात.

३) शेंगदाणे थोडे भाजून त्यावर थोडासा पाण्याचा हबका मारून परत थोडे भाजल्यास साले नीट निघून दाणेही पांढरे शुभ्र होतात.

४) कोणत्याही पक्वान्नासाठी पाक तयार करताना पाकाला उकळी फुटल्यावर थोडावेळ गॅस मंद करून पाकात थोडे दुध घालावे. २ मिनिटांनंतर साखरेतील सर्व घाण दुधाबरोबर वर येउन तरंगू लागते. झार्याने ती काढून टाकल्यास स्वच्छ नितळ पाक तयार होतो.

५) पुलावाचा कांदा तळताना अर्धा टीस्पून साखर घालून परतावा, कुरकुरीत होतो.

- शिल्पा शशिकांत पटवर्धन
(Kalyan,India)

Orchid Beauty Salon

Reetu Chudasama (licensed Estheticians)

432 233rd Pl SE,
Sammamish, WA
98074
425-881-0796 (By Appointment only)
Find us on Orchid Beauty Salon

SMM 2016 members get 10% discount on services $20 and above.
Membership card required.

Services: Eyebrow threading, Waxing, Warm oil head massage, Henna for hair, Customized Facials, Exclusive face and back polish

हि कविता म्हणजे माझ्या वडिलांनी माझ्या आत्याला पाठवलेली अनोखी भाऊबीजेची ओवाळणी आहे. माझ्या आत्येबहिणीला ती आकस्मात सापडली. तिने मला पत्रात लिहिले, " कवितेचा भाव किती उत्कट आहे ! २३ ऑक्टोबर १९५४ रोजी एडीन्बरा येथून तुझ्या बाबांनी ती त्यांच्या बहिणीस उद्देशून लिहिली होती, त्या कवितेची यंदा २०१५ साली एकसष्ठी झाली! आपण एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस साजरा करतो, तर कवितेचा का नाही ?" म्हणून मुद्दाम या वर्षी सारथीला ही कविता पाठवते आहे. हल्ली कोणी पत्रच लिहित नाही. माझ्या आत्याला हे पत्र मिळाल्यावर किती खास आनंद वाटला असेल याची कल्पना तिने ते पत्र इतके वर्ष जपून ठेवले यावरून येते !

मधुरा निरखे

सौ. सिंधूस,
भाऊबीजेच्या निमित्ताने,
मुक्तछंदांची ओवाळणी.....

सायंकाळी,
उभा होतो,
उत्तर समुद्राच्या तिरी

सहज पाहता,
दिसे चंद्राची
चिमुकली धनुकली

आठवण झाली,
दीपावलीची,
उद्या भाऊबीज

ओवाळणी घेवूनी,
भगिनीस भेटण्या,
मन धावे सहज

परंतू आले,
मध्ये आडवे,
सात समुद्रांचे जल

मन बिचारे,
तिथेच थबकले,
होवूनी चिंताकुल

सागराच्या,
लाटा आल्या,
धावुनी त्या पुढती

पुसती आस्थेने,
खिन्न मनाने,
होशी का रे कष्टी ?

उपाय म्हणोनी,
मदत करण्या,
सज्ज सागर अथांग

म्हणे कशाला,
हवे कृत्रिम,
रुपये नव्हे शिलिंग

तुजजवळची,
आठवणींची ओवाळणी,
तीच अधिक मौल्यवान

नेवून देण्यास
सेवेस तुझ्या
मी अन माझे स्वजन

झटकन बांधिली,
हर्षभराने,
आठवणींची पुरचुंडी

लाटांवरती,
डुलत निघाली
जगावेगळी ओवाळणी

मनात येई,
किती मोलाची,
सागराची हि किमया

सहज सांधिते,
प्रचंड अंतरे
आठवणीस न मर्यादा

- अच्युत थत्ते
एडिन्बरा, इंग्लंड

कोकिळेची इच्छा

कोकिळा म्हणे "लता दिदी, मला सा रे ग म शिकव"

माझ्या कुहुकुहु मध्ये तुझे एक गाणे बसव ।।

वाटे तुझ्यासारखी गावी ओळ एखादी

चाल मात्र असावी सरळ, सोपी, साधी ।।

सगळे म्हणतात बहिणी-बहिणी तुला अन मला

परि तुझ्या ओळखीचा अजून योग नाही आला ।।

लाजाळू मी, स्वर माझा फांदीआड खुले

तुला पहावयाला आहे मनी खुळावले ।।

माहित आहे नेहमीच तू असतेस घाईघाईत

माझ्यासाठी एकदा गडे ये ना आंबराईत ।।

शिकव मला आलाप, ठेका, अन थोड्याशा ताना

तुझ्या आवाजाची जादू मला कळू दे ना ।।

शिकेन त्याचे गळ्याशप्पथ, सार्थक मी करीन

तू दमशील जेव्हा, उसना-स्वर मी लावीन ।।

- सुमन श्रीराम फडके
(दादर, मुंबई)

Congratulations!!! Vibhuti Chausalkar Kavishwar for winning the first prize at the BMM 2015 Saregama Finals. SMM is proud of you.



TRAVEL EXPERTS &TOURS

travel.experts@comcast.net | www.amoltravel.com

☎ (425) 368-2462

We are a service oriented
professional travel agency
operating locally for the last **25** years.
We have competitive airfares,
vacation and tour packages
to all destinations world wide
originating from USA.

We specialize in INDIA TRAVEL
offering special fare for flights originating
from there. We also provide

competitive business class fares to and from INDIA

Building memories, one vacation at a time!

बंध मनाचे

दिवाळीचा सण हा मोठा, करु साजरा आनंदाने ||
एकत्र येउनी गाऊनी गाणी, वेळ घालवू हर्षभराने ||

घरापासुनी दूर राहुनी, टिकवुया ही दिव्य संकृती ||
प्रेम शृंखला घट्ट विणूया, कोमल हृदये जपण्यासाठी ||

आई बाबा-भाऊ बहिणी, मैलोंनमैल दूर असती ||
तुमच्या सारखे मित्र-मैत्रिणी, त्यांची उणीव भासू न देती ||

छेडूनी तारा मम हृदयाच्या, मनामध्ये केलेत घर ||
पुण्यकर्म हे गतजन्माचे, म्हणुनी अपुला जुळला स्वर ||

ऋणी मी तुमची जन्मभराची, साथ ही अशीच लाभू दे ||
वर्षानुवर्षे तुमची अमुची, नाळ ही अशीच जुळू दे ||

- प्रिती महाजन

एकटा

निरोप घेण्या सूर्याने हात जेंव्हा जोडले,
मी सावल्यांना सावकाश पैलतीरी सोडले

तेज ज्यांचे पाहता रात्र ही प्रकाशली
तेच तारे आज सारे काजव्यांनी तोडले

धूमकेतूने धडकता जाहलो उध्वस्त ही
जीवनाचे तुकडे मग मी आसवांनी जोडले

जाणली माझी नवी मर्यादा ही आज मी
आज थोडे, जुने वेडे, स्वप्नही मी खोडले

वादळे आली अशी की, नाते सारे हरवले
मी हळूच मला जरा, माझ्याकडे ओढले

- प्रफुल्ल सुर्वे

पहाट

एक अनोखी पहाट
ओल्या दवांत न्हाली
शुभ्र धवल धुक्याचा
रेशमी पदर ल्याली
चाहुल लागली त्याची
अरुणवर्णी झळाळी
रंग उषेचे गडद
लाजरी बावरी कळी
स्पर्श केशरी तयाचा
काया तिची उमलली
अनोखे नाते जडले
हसली पहाट गाली

- धनश्री केळकर

मैत्री

मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे काय असत?
जीवनातील एक पाडाव म्हणजे मैत्री असते
कधी रडवणार तर कधी हसवणार
पण सुख दु:खात आपली साथ देणार

मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे काय असत?
आपल्या दिवसाचा, शरीराचा, जीवनाचा भाग म्हणजे मैत्री असते
कधी त्रास देणार तर कधी काही खास देणार
पण नेहमीच आपली साथ देणार

मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे मैत्री म्हणजे काय असत?
कधी दारातून तर कधी नेट मधून मनात शिरणारी, मैत्री असते
कितीही त्रास् दिला या जगानी तरी मैत्री करण नेहमीच चांगलं असतं.

- सिद्धी देशपांडे

आई म्हणजे फक्त आई असते.....

आई म्हणजे फक्त आई असते, तिच्यासमं दुसरी कोणी नसते
अंधारलेल्या गाभार्यामध्ये, शांतपणे तेवणारी ती समई असते
रणरणत्या उन्हात, शीतल-छाया देणारी हिरवी वनराई असते

आई म्हणजे फक्त आई असते, तिच्यासम दुसरी कोणी नसते
खवलेल्या लाटांमध्ये, किनारा दाखवणारी दीपस्तंभ असते
शेवट दिसू लागलेल्या मनाला, मिळणारा नवा आरंभ असते

आई म्हणजे फक्त आई असते, तिच्यासम दुसरी कोणी नसते
तहानेने व्याकुळलेल्यांना, थंड पाणी देणारी जलदात्री असते
पावसामध्ये स्वतः भिजून, तुमची रक्षा करणारी छत्री असते

आई म्हणजे फक्त आई असते, तिच्यासम दुसरी कोणी नसते
कडकडणार्या थंडीमध्ये, उब देणारी मऊमऊ दुलई असते
तापवून थंडावलेल्या दुधावरची, ती नाजुकशी घट्ट मलई असते

आई म्हणजे फक्त आई असते, तिच्यासम दुसरी कोणी नसते
आपल्या मुलांच्या भल्यासाठीच, तिला नेहमीच कणव असते
तिच्या मायेच्या छत्राखाली, जगामध्ये कशाचीच उणीव नसते

- अर्चना साठ्ये

गरज

कोणाचे कोणावाचून अडत नाही
विधाता श्रध्येची परत फेड केल्यावाचून राहत नाही

म्हातारीने कोंबड झाकलं, म्हणून का सूर्य उगवत नाही
तुझे माझे याचा अहंकार सोडल्याशिवाय पर्याय नाही

मुक्ती मिळण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे, असे नाही
तूप स्वतःची आहुती विस्तवात धूर रूपाने करतेच की, नाही, कोणाचे कोणावाचून अडतच नाही

- अ. के. राठोड

स्वप्नांचे अंबर

अशी कशी देवा केली तू मला
अशी कशी देवा केली तू मला
रडूं बाई झाले मी
रडूं बाई झाले मी
झेलीन माझे मी दुःख
झेलीन माझे मी दुःख
राती स्वप्नांचे अंबर तरी
राती स्वप्नांचे अंबर तरी
देगा देवा छान!

भूपेन - नलिनी शाह

मराठी विश्व न्यू जर्सी व महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित रंगदीप दिवाळी अंक २०१५ मधील समस्यापूर्ती कविता स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेती कविता

मूळ कविता - ज्येष्ठ कवियत्री, लेखिका आणि गीतकार शांता शेळके यांची

'कळले नाही'

कोठे वळली कशी पावले?
कुठल्या होत्या दिशा खुणावीत?
काय प्रलोभन होत्या दावित?
कळले नाही

शब्द शहाणे चार समंजस
देऊन गेले जरी इशारे
कसे नि का अवगणिले सारे?
कळले नाही

अडवणूक ती मुळी न मानून
पुढे पुढे का जात राहिले?
क्षणही न वळुनी कसे पाहिले?
कळले नाही

ढकलीत होते कोण पुढे मज?
कुणी प्रेरणा दिली पावला?
खेचीत होता धागा कुठला?
कळले नाही

आणि अचानक आज परंतु
वाट कशी तिमिरातच विरली?
कशी दिशांची जाणीव सरली?
कळले नाही

शून्य भयावह विराणात या
आणि अखेरी कशी पोचले?
काय हरवले? काय वेचले?
कळले नाही

आज कळाले

कोठे वळली कशी पावले? कुठल्या होत्या दिशा खुणावीत?
अज्ञाताचे दोर नाचवीत कोण खेळीया होता खेळीत?
मी न कर्ता आणि करविता, आज कळाले

आयुष्याच्या वळत्या वाटा संगे वळती पावले
उपभोगाच्या दिशा खुणावून दाविती मोह प्रलोभने
धावे मन हे स्वैर दशदिशा, आज कळाले

टाकून शहाण्या शब्दांना मन अचपळ धावे पुढे पुढे
सूज्ञ इशारे गतकाळाचे देई झुगारून जिथे तिथे
वारू मनाचा सहजी नावरे, आज कळाले

आकांक्षांचा हात धरुनी विजिगीषेचा धागा खेचे
जिजीविषा ही देई प्रेरणा पावलांस बळ देत असे
इच्छा तेथे मार्ग दिसे, आज कळाले

आणि अचानक काळ गाठता थकती गात्रे
अंतकाळी हा श्वास थबकता तिमिर दाटे
शून्य होऊनी जाती दशदिशा, आज कळाले

संसाराच्या विराणात या जीव मृगसा भ्रमत असे
शोधीत कस्तुरी चैतन्याची जिकडे तिकडे पाहतसे
स्वांतरी झाकून परी न पाहे, आज कळाले

- कादंबिनी धारप

आपण सारी पुस्तके

आपण सगळे
छापील पुस्तकांसारखे
कुणी आगळे-वेगळे
कुणी अगदी प्रेमाला पारखे

कुणाला पित्याचे कव्हर नाही
कुणाला मायेचे बाईंडिंग नाही
एखाद्याला हक्काचे घर नाही
तर कुणाला नवा कोरा वास नाही

कधी कुणाची पाने खिळखिळी
जीर्ण होऊन कधी होते जाळी
कुणाची एकत्र नांदतात सगळी
कधी विखरुन होतात वेगळी

एखादं पुस्तक रडवतं खूप
एखाद्याला नात्यांचे फारच अप्रूप
काहींची स्वप्ने होतात फलद्रूप
काहींचा मजकुर अतिविद्रूप

काही पुस्तके फार बोलकी
काही निवडक आणि शेलकी
एखाद्या पुस्तकात जमाखर्चाचाच हिशोब
एखाद्याच्या छपाईची पार बोंबाबोंब

कुणाच्या पानापानांवर हास्याची पेरणी
वाचल्यावर जणू मिळते मेजवानी
काही पुस्तकेच असतात गाणी
सहज ओघळते डोळ्यातून पाणी

काही पुस्तके फार बोअर करतात
काही इतिहासाचे डोस पाजतात
काही पुस्तके सतत भटकतात
काही एकाठिकाणी धूळ खातात

आवडत्या पुस्तकाला समुद्रकिनारी घेऊन जावं
कधी त्याच्या मनातलं गुपित वाचावं
हळूवारपणे त्याला हाताळावं
कधी कुरवाळून आपलसं करावं

चकचकीत कव्हराच्या पुस्तकात
वाटतं आहेत सुरस कथा
बंद कव्हराच्या आड
कधी दडलेल्या असतात व्यथा

बालपणीच्या बडबडगीतांचे पुस्तक
नेहमीच आपले वाटते
ऑफिसातील टेबलावरचे पुस्तक
पगाराचे आकडे आणते

काहींची दोनचार पानांतच पाठवणी होते
काही उमगायलाच २०० पानानंतर सुरुवात होते
घरच्या पुस्तकाकडे बऱ्याचदा दुर्लक्ष असते
बाहेरच्या पुस्तकांचे नको इतके ओझे असते

एकाच पुस्तकात काही सगळे ज्ञान नसते
विश्वकोशालाही संख्येचे लिमिट असते
वाचनाचे हे वेड नसून व्यसन असते
उदास आयुष्य सुखी करायचे एक साधन असते

अशा या पुस्तकांच्या पसाऱ्यात,
आपण सगळे सारखे
त्या छापील पुस्तकांसारखे,
अगदी छापील पुस्तकांसारखे.....

- धनश्री केळकर

Illustration by 123freevectors.com

कृष्णाई

स्मरूंनी तुला उभी आहे तुझ्या दरबारी
प्रार्थना कराया अंतरीचा हा खेळ सारीपाटावरती

अश्रुंनी सजवली तुझ्या फुलांची टोकरी
दु:खाच्या भावनांनी सजवला हा हार ही

अंतरिक मनाच्या भावनांनी सजवली ही
दीपवात आरती.....

घंटा किणकिनाद खरा वाजे चौफेरी
प्रगट होशील आता तरी डोळे दिपून जातील खरी

प्रसन्न मन चित्त तत्त्व विसरुनी
आयुष्य तुझ्या चरणी ठेवीते हेच मी

घेशील मला कवेत तू ना
पुढचा प्रवास हा माझा तुझ्या खांद्यावरी

संपता संपता उभी राहिले खरी
हीच तुझी परीक्षा समजूनी

माझ्या भावनांना वाट दिलीस
तुझ्या ह्या आशिर्वादाने...

- आरती लोटलीकर

1			4			7		9
	8			2			5	
	5				9			
8				3			6	7
	3		5		7			
5						2		4
				4			7	
						3		5
		5			8			

Created By Savita Dhaneshwar

Illustration by 123freevectors.com

चित्रकार-मधुरा निरखे

प्रत्येकाच्याच मनात एक राम आणि एक रावण असतो.....

प्रत्येकाच्याच मनात एक राम आणि एक रावण असतो
वेळेनुसार मनुष्याचा स्वभाव तोच तर प्रकट करत असतो

रावणास आचरणात आणण्याचे असते खूपच सोपे काम
जवळ असावा लागतो त्याकरिता फक्त खोटा स्वाभिमान
अन जोपासावी लागते दुसऱ्यांना न समजून घेण्याची वृत्ती
नकारात्मक भावना असाव्या लागतात सतत तुमच्या चित्ती

जेव्हा रावणरुपी मन देऊ लागते समोरील आत्म्यास त्रास
तेव्हा होत राहतात त्याला केवळ खोट्या सुखाचे आभास
दुखावलेल्या व्यक्तीचे तो घेत राहतो तुमच्यासाठी व्यर्थ
शाप व क्रूरतेने जमा करत राहतो तो तुमच्या घड्यात फक्त पाप

सदैव मनात राम जोपासणे हे कार्यच अवघड फार
गिळून टाकावा लागतो मग मनाला स्व: चा अहंकार
काटे बोचून वेचावी लागतात इतरांकरिता आयुष्यात फुले
करून मोठ्या मनाचे क्षमाशील दालन या जगाकरिता खुले

मनीचा राम जेव्हा प्रकट होतो, दुसऱ्यांना सुखावा देऊन
जातो सुखावलेल्या आत्म्याचे दुवे तोच तुम्हाला नकळत
देत राहतोम्हणूनच असेल मनात राम तर दिसेल
अधिकच सुंदर हे जग आणि केलेल्या कृतीसाठी नाही
होणार तुमच्या मनाची तगमग

रावणावर विजय मिळविणे जरी होते रामारायासाठी थोडे
अवघड पण जवळी त्याच्या होती नम्रता व विवेकी
बुद्धीची अजब सांगड जसा निष्ठावतं रामाने मिळविला
कपटी रावणावर अभूतपूर्व विजय आपल्या मनातील
रावणाला मारण्याचा चला करुया आजच निश्चय

- अर्चना साठ्ये

नाती आयुष्यातली....

काही नाती आयुष्यातली जरी असली रक्ताची
भासतात आतून खोल पण असतात वरवरची
आणि असतात काही नाती निखळ दोस्तीची
आल्हाददायक आणि उब देत राहतात मत्रैीची
काही नाती वरून दिसतात कणखर
पण आतून असते फक्त मायेचीच फुंकर
आणि काही नाती असतात माणुसकीची
सकंट काळी धावून येणाऱ्या देवमाणसाची
काही नाती असतात अभेद्य गुरु-शिष्याची
गुरूची निस्वार्थी अपेक्षा उन्नती व्हावी शिष्याची
काही नाती असतात नाजूक रेशम गाठी
तेवढीच कसोटी लागते ती टिकण्यासाठी
काही नाती जोडली जातात आपसूकच
घट्ट होत राहतात आपल्याच नकळत
नाते टिकण्यासाठी फक्त रक्त एक असण्याची गरज नसते
त्याकरिता फक्त निस्वार्थी प्रेम अन माणुसकीच बस्स असते
असेल नात्यांमध्ये प्रेमाचा ओलावा तर जगात कसली उणीव नसते
अश्या नात्यांच्या सुखद सावलीत दुःख हि मृगजळ सारखेच भासते

- अर्चना साठ्ये

Illustration by 123freevectors.com

ओळखीचे अनोळखी

स्वप्नांचे प्रवाह अखेरचे शमले सारे
पाहून त्यांची हार कदाचित, दमले सारे

हृदयामध्ये धुंद कट्यारी धुमसत होत्या
अश्रू रोकले, हास्य फेकले, भ्रमले सारे

वास्तवाचे हे रे गीस्तानी कुंपण माझे
स्वार्थाच्या हिरवळीतून पाहत, रमले सारे

विझण्याआधी क्षणोक्षणी मी लाख जळालो
विझल्यानंतर आग बघाया, जमले सारे

सूर्याच्या किरणांचा दिनभर केला हेवा
काळोखाने लाथ झाडली, नमले सारे

- प्रफुल्ल सुर्वे

सदिच्छा संदेश

आमचं काहीएक म्हणणे नाही
आहे, त्यात भर घालता आली तर
घाल, किंवा नको घालूस, पण
कमी होऊ देऊ नकोस
आमचं काहीएक म्हणणे नाही

सत्कृत्य कामासाठी आयुष्य घालव,
आयुष्य खूप खूप मजेशीर आहे
त्याचा स्वाद घ्यावयास हवा,
आता थोडा अवधी राहिला आहे
डोळे मिटण्याचा,

वरील गोष्टींची पूर्तता करता आली
तर, किंवा नको करूस
आमचं काहीएक म्हणणे नाही

- अ. के. राठोड

एक पाऊस हवा आहे

रानोमाळ कोसळणारा
दु:खाचे मळभ हटवून
सुखाचे शिंपण करणारा

एक पाऊस हवा आहे
चिंब चिंब भिजवणारा
सुखदु:खात न्हाऊन सुद्धा
अंतरी विरक्त ठेवणारा

एक पाऊस हवा आहे
मनात खोलवर राहणारा
आभाळभर पसरून देखील
ओंजळीत विसावणारा

--धनश्री केळकर

Illustration by 123freevectors.com

Murg Saagwala

Ingredients: Chicken boneless cut into cubes 2 pounds, onions 2 (Crushed), tomatoes 2, Blanched Spinach puree 1 cup, Cilantro chopped finely ½ cup, ginger paste 1tsp, garlic paste 2tsp, green chillies 3, bay leaves 2, cinnamon 2 sticks, garam masala ½ tsp, coriander powder ½ tsp, turmeric powder ¼ tsp, Kasuri methi 1tsp, Salt, Oil 4 tbsp, butter 4 tbsp, Maize flour 1 tbsp, Red Chilli powder 1tsp, Fenugreek powder ¼ tsp

Method: Heat oil in a pan, add bay leaves and cinnamon. Add butter 3tbsp and sauté onions till light brown, then add ginger garlic paste, tomatoes and turmeric and sauté till oil separates. Then add the spinach puree, Cilantro, Garam masala, red chilli powder, coriander powder and cook well. In another pan add the remaining butter, green chillies and the chicken cubes. Sauté well till it changes its color. Add chicken to the spinach gravy and then add the fenugreek powder and kasuri methi and maize flour paste. Cook till chicken is done. Top with 1 tbsp of ghee and serve hot with roti or paratha.

Methi Paneer

Ingredients: Methi leaves 1 big bunch, 1 large onion chopped, 1 tbsp garlic paste, 2 tomatoes chopped finely, salt, Red chilli pd, ¼ tsp haldi, 4 green chillies, coriander powder ½ tsp, Garam Masal ¼ tsp, paneer cubes, methi seeds 1/4 tsp, oil, 1tbsp Amul butter, 1Tbsp cashew paste, Salt and sugar as per taste.

Method: Heat oil, add methi seeds, onion chopped and garlic paste. sauté well. Then add tomatoes, green chillies finely chopped and cook till oil separates, then add the paneer cubes, Garam masala, coriander powder, salt and sugar. sauté well. In another pan add Amul butter and a tbsp. of oil sauté methi leaves well and add it to the gravy. Add cashew paste and give it a boil. Serve hot with Roti. Top with ghee to enhance the taste. You can also add some corn to this recipe to bring more color.

Tropical Strawberry Fruit Salad

Ingredients: 500 grams of tinned cubed pineapple, 250 grams fresh strawberries, 100 gms butter cookies crumbled, 1 cup praline powder, 300 grams whipped cream.

Method: In individual serving bowls arrange pineapple pieces, then add chopped strawberries, sprinkle crumbles cookies and praline powder. Swirl cream using star nozzle in a piping bag. Garnish with Cherries and a mint leaf and serve chilled.

Praline powder recipe - Ingredients: 3/4 cup sugar, half cup cashew roughly crushed and 1 tsp of butter. Method: Cook sugar till caramelized and then add cashews and butter. Mix well and set it on a greased tray. Cool it and powder.

Happy Cooking!!!!!!

- Recipes Contributed by Rama Herwadkar

A	P	X	E	B	D	U	L	Z	H	T	W	N	C	R	P	F
Z	R	U	N	Q	H	V	F	H	N	E	Y	V	Q	A	L	X
T	I	Y	M	C	O	S	J	A	K	N	C	A	D	S	H	K
H	D	V	F	S	J	N	R	P	A	T	X	P	E	H	S	Q
O	L	I	B	U	Z	K	T	P	L	A	Y	L	W	S	I	M
S	L	A	W	B	N	S	I	Y	I	C	W	O	D	I	J	D
L	O	W	F	A	Z	R	W	N	K	Ñ	L	E	O	Z	N	L
Q	E	N	S	I	L	L	Y	E	A	L	A	E	Y	E	M	Q
K	L	S	I	A	R	I	V	W	E	Y	X	T	I	A	R	T
F	A	M	S	B	D	H	F	Y	Z	T	M	R	A	C	F	O
A	F	V	T	H	T	R	M	E	I	B	F	A	R	P	Z	R
U	O	N	E	S	O	F	P	A	R	T	Y	B	E	J	X	W
D	P	Z	R	W	S	W	I	R	S	B	K	A	S	F	K	R
I	A	M	E	D	P	O	E	E	D	R	L	T	A	W	I	P
M	B	K	D	S	I	F	B	R	O	T	H	E	R	M	Q	E

Created By Savita Dhaneshwar

Can you find the following words?

1)Diwali 2)Fill 3)Sweet 4)Happy New Year 5)Play 6)Yellow 7)Party 8)Best Friend 9)Sankrant 10)Fun 11)Wee 12)Are 13)Low 14)Silly 15)We 16)Sister 17)Brother 18)Rabata 19)Win 20)Lei 21)Shower 22)Less 23)Kin 24)piñata 25)Row 26)Tent

Have fun!

Illustration by 123freevectors.com

SUREKHA K. MURTHY

Realtor® & Relocation Specialist

(425) 941 0654

Surekha@Windermere.com

RESIDENTIAL ♦ NEW CONSTRUCTION ♦ INVESTMENTS

www.SKMHomes.com

Windermere

Windermere Real Estate/Northeast, Inc.

सियॅटल महाराष्ट्र मंडळ
MH१२-पक्के पुणेरी-खाऊ गल्ली
सूचना
Kolhapuri Misal
पा णी पू री
सोल KaDi
PERFORMING ARTS CENTER
Kolhapuri Misal $5
Thanksgiving

संक्रांत २०१५

होळी आणि गुढीपाडवा २०१५



उन्हाळी सहल २०१५

महाराष्ट्र मुख्यमंत्री– श्री. देवेंद्र फडणवीस



गणेशोत्सव २०१५

Ruhika Shah
Saachi Ambikar
Vibha Vaidya


Wednesday Sept 23rd @ 5:30

2015

VOLLEYBALL
CA105
This Friday

सियॅटल महाराष्ट्रमंडळ

गणेशोत्सव २०१५

आजी-आजोबांबरोबरच्या गप्पा-गोष्टी....

२०१५ शिबीर

सारेगम २०१५

आठवणीतली एक सूर संध्याकाळ - राहुल देशपांडे



दिवाळी २०१५

BelRed Dentists

Our services include:

- *Sedation Dentistry (Oral and Nitrous)*
- *Cosmetic Dentistry (Crowns, Veneers, Bridges, smile makeover)*
- *Pediatric Dentistry*
- *Root Canals*
- *TMJ, Night/sports guards*
- *Extractions (Surgical Wisdom teeth)*
- *Implants & Implant crowns*
- *Teeth Whitening*
- *Dentures/Partials*
- *Emergency: same day treatment*
- *Accepting kids as young as 6 months*

NEW PATIENT SPECIAL

$50 Off Dental Treatment

New patients only. Can only be used with services of $300 or greater. No cash value. Not valid with any other offers or prior services. Certain exclusions may apply.

SPECIAL OFFER

FREE TEETH WHITENING

Valid with new patient exam, full mouth X rays and necessary cleaning. Limit 1 per patient. No cash value. Not valid with any other offers or prior services.

Call 425.641.5000 for appointments

Mon-Fri 8am-6pm
Sat 8am-4pm

We accept most insurances.

We offer relaxed environment with TV / Movies and WiFi.

Conveniently located close to 520 and Microsoft - 2217 152nd Ave. NE, Suite 150, Redmond, WA 98052

Personalised Medical Care.

Evergreen Internists is an internal medicine practice based in **Redmond** Washington.

We provide the highest quality medical care in a personalised way to every patient. We create patient relationships based on mutual respect and trust.

Some of the treatments offered
• Heart disease • Hypertension
• Diabetes • Arthritis • Asthma

Dr. Sahi is the primary internist and has been well known to North Seattle Community through his association with Northwest hospital since 1999. Before settling in Kirkland he practiced for 5 years in Ohio.

EVERGREEN INTERNISTS

Call **425.825.3900** or visit **www.evergreenmd.com** to make an appointment.

2217 152nd Ave NE, Ste 100, Redmond - 98052

Recent Transactions

Sammamish

Redmond

Bothell

Redmond

Sammamish

Redmond

Excellent Service

Up to 2% Commission Back incl New Homes

"Amod is dedicated, prompt and expert. He provided lot of knowledge and big commission back. Highly recommend him." - Actual Client

Buying – Selling – Investment – Eastside

Amod Samnerkar

Licensed Real Estate Agent

info@amodrealty.com

Cell: 480-225-5323

www.amodrealty.com

Swanand LLC

Zillow

5-STAR AGENT